२२ फेब्रुवारी १९६९ । मूल्य ४० पैसे

# माणूस

सारेजण चिंताच करीत होते. पण ही चिंता आपापल्या स्वार्थाची होती.
व्यापक चिंता करणारी एक व्यक्ती भेटल्याचा म्हणूनच
मला विलक्षण आनंद झाला होता.

' राणीचा बाग '



समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : एकुणचाळिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. फेब्रुवारी, ७

दि. ८ फेब्रुवारीच्या अंकातील श्री. प्रकाश देशपांडे यांचे 'तो मी नव्हेच' वरील पत्र वाचले. श्री. गो. बा. सावंत ह्यांच्या पत्रातील 'मुद्दा' डावलून त्यांनी केलेले आरोप आश्चर्यकारकच नाहीत काय?

अमरिकसिंगाने आपल्या जबानीत 'हरबीरकौर' हे पात्र निर्माण केले असे मानणे म्हणजेच त्याची जबानी हा अथपासून इतिपर्यंत बनावच आहे असे कोर्ट मानणार नाही काय? सरदार लाभसिंगांना पाचवी मुलगीच नसेल. अमरिकसिंग ती कल्पनेनेच निर्माण करून प्रतिपक्षाला आपल्याविरुद्ध एक मोठा पुरावाच देत नाही काय?

अर्थात ॲड. कानिटकरांच्या सुरुवातीच्या निवेदनांतील ही एक चूकच मानावी लागेल. पण एवढ्या क्षुल्लक चुकीला महत्त्व कसले द्यायचे? ॲड. कानिटकरांनी दुसऱ्या कथेची तयारी करावी. आधुनिक विज्ञानेश्वरीचे 'स्वागत' असो. सुधीर वर्टी, मुंबई.

स. न. फेब्रुवारी, ९

आपल्या दि. १ फेब्रु. १९६९ च्या 'माणूस' अंकातील 'छोट्या कारखान्यांची परवड' हा लघुलेख वाचला. आपण मध्य प्रदेशातील कारखान्यांचा Survey करून एकंदरीत प्रसिद्ध केलेली माहिती उल्लेखनीय खात्रीनेच

किंमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत

आहे. याच दृष्टिकोणातून आपण महाराष्ट्रातील लघुउद्योगधंद्यांचे पाहणीमान काढून त्यांचीही माहिती प्रसिद्ध केल्यास फारच उत्तम होईल. यामुळे दोन-तीन गोष्टींचा ऊहापोह जरूर करावासा वाटतो, तो म्हणजे असा की,

१. यातून मिळणारी माहिती सरकारी कचेरीपर्यंत पोहोचते काय ?

२. पोहोचवली गेल्यास त्यावर उपाययोजना म्हणून अधिकारीयंत्रणेचे व त्याचप्रमाणे शासनसंस्थेचे लक्ष कशा प्रकारे वेधता येईल ?

३. नवीन उत्पादनक्षेत्रात पदार्पण करणाऱ्यांना Life-Saver अशी काही यंत्रणा करता येईल काय ?

या बाबतीत माझी वैयक्तिक मते मी खालीलप्रमाणे मांडू इच्छितो :

१. लघुउद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी निघणाऱ्या स्कीम्स् सरकारी यंत्रणेकडे जाण्यापूर्वी पूर्णपणे खाजगी अनियंत्रित परंतु कुशल व कर्तबगार व्यक्तींच्या समितीकडून पूर्णपणे Recommend व योग्य आहेत याचा दाखला घेतल्यास मिळणारे सरकारी कर्ज अनिर्बंधपणे व्यापारी वर्गाकडे वर्गीकृत होणार नाही. यामुळे Technical Hands व Technical Entrepreneurs ना कदाचित् खरा वाव मिळू शकेल.

२. या कारखान्यांना लागणारा पैसा व ऑर्डर्सदेखील एका अशाच यंत्रणेकडून पुरविल्या गेल्या पाहिजेत. यात दोन गोष्टींचा समावेश आवश्यक आहे.


(अ) सरकारी धोरणाने अनिर्बंध सवलती मिळणाऱ्या व Priority म्हणून काम करणाऱ्या मोठ्या उद्योगधंद्यांनी त्यांचे सुटे भाग तयार करण्याचे काम वरील यंत्रणेकडे दिलेच पाहिजे. त्यांच्याकडूनच भागाची आयात केली पाहिजे.

(ब) यामुळे प्रत्येक कारखान्यास योग्य दिशेने वाढण्यास वाव मिळेल व एकाच प्रकारच्या उत्पादनावर ते अवलंबून राहणार नाहीत. शिवाय त्यांच्याजवळ असलेल्या यंत्रसामग्रीचा ते पुरेपूर उपयोग करतील व त्यावर अकारण बोजा पडणार नाही.

(क) या Priority Industries कडून मिळणाऱ्या ऑर्डर्स व त्यांच्या किंमतीवरून होणारी उलाढाल लक्षात घेऊन दिलेल्या ऑर्डर्सचा वाटा बघून संबंधित कारखान्यांना पतीचे (Credit) संरक्षण देण्यात येईल.

यांत अजूनही काही प्रकारे सुधारणा करून एक यंत्रणा निर्माण केल्यास बरेच होईल. महत्त्वाचे म्हणजे ही यंत्रणा प्रत्येक कारखान्यास एक consulting म्हणून ठरेल व ती निमसरकारीपणे छाननी पण करू शकेल. यात Industrial Engineering व Economics भागही अंतर्भूत आहेच. त्यामुळे productivity देखील साधारणत: Acceptable limits मध्ये राहू शकेल.

बाळकृष्ण जाजू, पुणे



# राणीचा बाग

**वसंत जोशी**

दुपारी एक वाजण्याच्या आतच फोर्ट विभागातल्या सर्व कचेऱ्या बंद झाल्या. कारण एकपासूनच कर्फ्यूचा अंमल जारी होणार होता. सगळीकडे धावपळ व धांदलीला सुरुवात झाली. मिळेल ती गाडी पकडण्याचा जो तो विचार करीत होता. शस्त्र-धारी पोलिसांचे घोळके चौका–चौकातून उभे होते. दुकाने भराभर बंद केली जात होती. रेल्वेच्या स्थानकांकडे सर्वजण धावत होते. पळत होते.

स्थानकांवरील गर्दी पाहता गाडीत जागा कशी मिळेल ही चिंता प्रत्येकाच्या मनात होती ! विशेषतः दूरच्या उपनगरांत राहणाऱ्या प्रवाशांच्या चेहऱ्यावर तर भीषण चिंता दिसत होती. गाडीत जागा कशी मिळेल ही पहिली चिंता व ही गाडी मुक्कामाच्या स्थानकापर्यंत जाईल किंवा नाही ही दुसरी चिंता ! आता अफवांना पंख फुटू लागले. गर्दीतल्या गर्दीत, कोणी तरी कोणाला सांगत होते– ‘ भायखळ्याच्या पुढं गाडी जाणारी नाही म्हणे !’ दुसरा सांगू लागला, ‘ दादरला गाडीवर दगडफेक झाली म्हणे.’ तिसरा बोलला, ‘ माहीमला गाडी जाळली !’... मुंबई अशी पेटू लागली होती...का, कशासाठी व कोण हे जाळत होते...याचा कोणालाच पत्ता नव्हता !

गाडी स्थानकावर आली व आत शिरण्यासाठी एकदम गर्दी उसळली. गर्दीच्या ढकलाढकलीतच मी एका डब्यात अलगद फेकला गेलो. जिथे मी फेकला गेलो तेथेच मी बसलो. गाडीत अफाट गर्दी होती. पण एकदम शांतता पसरली गाडीत ! काही तास गेले तेव्हा गाडी हलली. बोरीबंदर स्थानक सुटले व मग हळूहळू बोलणी सुरू झाली. कोण कोठे जाणार याची चौकशी आधी झाली. मग दंगलीच्या बातम्या सुरू झाल्या. सिकंदराबाद एक्सप्रेसच्या गाडीत मी चढलो होतो

खरा...पण त्याही गाडीत बरेच ओळखीचे चेहरे दिसू लागले. कोण आमचा कर्जतवाला–कोणी लोणावळावाले, कोण पुणेकर...मला जरा हायसे वाटले !

‘ रेडिओवरची ताजी बातमी सांगतो. लालबागला गोळीबार झाला. चार माणसं ठार झाली ’–एक म्हणाला.

‘ रेडिओवर चार माणसं ठार झाली म्हणून सांगितलं गेलं ना ? मग हा आकडा नक्कीच जास्त असला पाहिजे ! ’ एक तर्कटशास्त्री बोलले.

‘ शिवाजी पार्कजवळ बस जाळली म्हणे खरं का हो ?’ एक प्रश्न !

‘ खरं म्हणून काय विचारता ? मी प्रत्यक्ष...’ उगाच जीभ चावून उत्तर देणारी व्यक्ती थांबली.

कोपऱ्यातला म्हातारा म्हणाला, ‘ दादर हेच दंगलीचं केंद्र झालं आहे म्हणून अधिक काळजी वाटते हो ! ’

‘ का हो, दादरला काही तुमचे विशेष ?’ शेजारच्या म्हाताऱ्याचा प्रश्न.

‘ उद्यापर्यंत ही दंगल मिटली नाही म्हणजे केवढा अनर्थ होईल ! दादरला मंगल-कार्यालय घेतलं आहे. लग्नाची संपूर्ण तयारी केली आहे. किती खर्च आतापर्यंतच झाला म्हणून सांगू ?’

‘ कोणाचं लग्न आहे ?’ दुसरा म्हातारा.

‘ मुलीचं ! ’ पहिला म्हातारा....

‘ माहीम लवकर शांत होईल असं वाटत नाही ! ’ एक चष्मेवाला बोलला.

‘ माहीमला आणखी कोणाचं लग्न आहे ? ’ एक मिस्किल प्रश्न.

‘ छे–हो. कसलं लग्न ! पत्नीचं ऑपरेशन झालं आहे माहीमच्या एका हॉस्पिटल-मध्ये ! तिच्याजवळ खरं तर आता कोणीतरी...! ’

गाडी एकाएकी थांबली. दादर स्थानक आले होते. धडाधड खिडक्या बंद केल्या गेल्या. बाहेरील गर्दी आत येऊ नये म्हणून घेतलेली काळजी अगदी फुकट गेली. दादर· स्थानकावर तशी गर्दीच नव्हती. कदाचित हा कर्फ्यूचा परिणाम असावा. गाडीतलेच दोन प्रवासी उतरले व एक मिलिटरीवाला आत आला व आत आल्या आल्या त्याने एक शिवी हासडली....

‘ च्या आयला ! मुंबै पाहावी म्हणून आलो तर ही भानगड !

‘ मुंबईचं हेच रूप खरं पाहण्यासारखं आहे राव ! ’ ...एक मिस्कील आवाज !

‘ तुमचं ठीक आहे राव ! कोल्हापुरासन् इथं आलो पैसं खर्च करून, आणि त्यात ही भानगड निगाली मधीच ! ’

– मिलिटरीवाला चिडून बोलत होता. ‘ रजेवर आलो, चार दीस मुंबैत तर ही कटकट ! सायनला धाकटा भाऊ असतो. त्यो म्हणाला, तू आता नग राहूस इथं ! हे सायन आता असंच पेटलेलं राहणार !

कोणी काही बोलत नव्हते. जरा थोडा वेळ सामसूम झाली. दादर स्थानकावरून गाडी एकदाची हलली. गाडी पुढे पुढे जात होती...ठाणे ओलांडल्यावर जरा बरे

वाटू लागले. आता काळजीचे कारण संपले होते. आता गाडीवर दगड पडण्याची भीती नव्हती.

मुंबईच्या दंगलीचा प्रत्येकजण स्वत:पुरताच कसा अर्थ लावीत होता, याची मी मनात तपासणी करीत होतो. या दंगलीमुळे कोणाच्या लग्नात व्यत्यय आला होता क़ोणा आजारी माणसाची गैरसोय झाली होती. कोणाचे दुकान जळाले होते. कोणाचा व्यवसाय बुडाला होता. कोणाची भाकरी त्याला त्या दिवशी मिळाली नव्हती...सारेजण चिंताच करीत होते. पण चिंता स्वतःच्या स्वार्थाची होती. सरकारी मालमत्तेचे नुकसान अतोनात झाले होते. चार कोटींचे नुकसान म्हणजे काय झाले ? बसेस जळाल्या त्याचे काय ? गाड्यांची मोडतोड झाली त्याचे दु:ख कोणाला ?

या गोष्टीचे सोयर सुतक कोणालाच नसावे ! राष्ट्राची संपत्ती ही आपली संपत्ती याचे भान कोणाला आहे ? हे शिकविलेच कोणी आम्हांला ?

चिंता प्रत्येक व्यक्तीची वेगळी होती. पण ती वैयक्तिक स्वार्थापलीकडची नव्हती. त्या चिंतेचे स्वरूप व्यापक नव्हते. या विचारांच्या तंद्रीतच मी गाडीतून उतरलो केव्हा व घरी पोहोचलो केव्हा हे लक्षात आले नाही !

दारात पाऊल वाजले तसा किरण धावत आला. त्याच्या डोळ्यांत पाणी होते. दंगलीची वार्ता येथपर्यंत आली असणार व त्यामुळेच किरण रडत असणार असे समजून मी त्याला उचलून घेतले. त्याच्या डोळ्यांतले पाणी पुशीत विचारले, ‘ काय झालं किरणराव ?’

गळ्याला मिठी मारून रडक्या आवाजातच त्याने मला विचारले, ‘ बाबा, मंबईला खूप दंगल झाली ? ‘ राणीचा बाग ’ जाळला ?’

‘ अरे हो ! पण तुला काय झाले रडायला ? कोणी सांगितलं हे सारं तुला ? राणीचा बाग कोण जाळील ?’ मी विचारले. ‘ आणि एवढ्या जाळपोळीत समज, तुझा तो . . . . . !

‘ नका ना बोलू असे बाबा ? राणीच्या बागेला आग लावली तर तिथल्या हरिणांनी, सशांनी कोठे जावे ?’ किरण रडत रडतच बोलत होता !

स्वतःच्या स्वार्थापलीकडे विचार करणारी, चिंता करणारी एक व्यक्ती मला भेटल्याचा विलक्षण आनंद झाला होता, पण त्याच वेळी मी मनातल्या मनात आक्रोश करीत होतो. अशी चिंता इतरांना का वाटत नाही ? ही निष्पापवृत्ती आमच्यात का नाही ? . . . . .

याच वेळी रेडिओवर बातम्या लागल्या . . . . ‘ दंगलीत एकूण चाळीस ठार . . . . दोन हजार माणसांना अटक . . . . ’

मी धावत जाऊन रेडिओ बंद केला ! !

O

२२ फेब्रुवारी १९६९

मुंबई समाचार

सु. ल. सोमण

# प्रे. आयूबखान नरमले

पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष आयूबखान ह्यांनी केलेल्या नवनवीन आवाहनांमुळे, देऊ केलेल्या सवलतींमुळे खवळलेला पाक शांत होईल का ? पाकिस्तानमधून येणाऱ्या बातम्यांवरून, प्रे. आयूबखान व विरोधी नेते ह्यांच्यांतली बोलणी होईपर्यंत तरी निदान पाकिस्तानातील उग्र आंदोलने थांबणार नाहीत असे दिसते. ह्या आंदोलनांत अगदी अलीकडेच आपापले बुरखे झटकून टाकून पाकिस्तानी स्त्रिया रस्त्यांवर आलेल्या आहेत. मारामाऱ्या, जाळपोळ, गोळीबार, सशस्त्र चकमकी अद्यापही तेथे चालूच आहेत. पख्तुनिस्तानची चळवळही ह्याच सुमारास अधिकाधिक उग्र बनू पाहत आहे. ह्यांत भर म्हणून १४ फेब्रुवारीपूर्वी आणीबाणी उठवली गेली नाही तर आमरण उपोषण करण्याची धमकी पाकिस्तानचे माजी परराष्ट्रमंत्री श्री. भुत्तो ह्यांनी दिलेली आहे. भारतावरील दोषारोप, कश्मीरचे आव्हान, ह्या नेहमीच्या हुलकावण्यांनी पाकिस्तानी जनतेचे ह्या वेळी मुख्य प्रश्नावरून लक्ष वेधून घेणे पाक सरकारला जमलेले नाही, आणि म्हणूनच वाढत्या आंदोलनांचा दबाव येऊन प्रे. आयूबखानांना विरोधी पक्षीयांना बोलावणे भाग पडलेले आहे.

फेब्रुवारीच्या एक तारखेला, राष्ट्राला उद्देशून भाषण करताना प्रे. आयूब ह्यांनी विरोधी पक्षीयांबरोबर बोलणी करायची तयारी दर्शविली. एवढेच नव्हे तर घटनेत बदल करण्याचीही तयारी दर्शवली. ह्यानंतर सात-आठ दिवसांतच, त्यांनी आणीबाणी शिथिल करण्याची किंवा उठवण्याची तयारी असल्याची घोषणा केली. प्रे. आयूबखान ह्यांच्या ह्या सर्व घोषणांचा व आवाहनांचा जनतेवर परिणाम होऊन आंदोलनाची तीव्रता कमी होईल, अशी अपेक्षा होती, पण अद्यापही आंदोलनांचा जोर कायमच आहे. आणि ह्या पार्श्वभूमीवर प्रे. आयूबखान कदाचित आता अधिकाधिक सवलती जाहीर करतीलही व स्वतःचे डळमळते आसन सावरायचा प्रयत्न करतील. पण एवढ करूनही आयूबसरकार सावरले जाईल का ह्याची शंका वाटते. वास्तवतः आयूबखानांची सर्व सत्ता सैन्याच्या जोरावर आहे. परंतु एअर-मार्शल अशगरखान आदींच्या वि ोधाने व भुत्तोंना असलेल्या तरुण सेनाधिकाऱ्यांच्या पाठिंब्याने, आज पाकिस्तान सेनेतही दुफळी माजली आहे व त्यामुळेच प्रे. आयूबखानांची पकड खऱ्या अर्थाने सैल झाली आहे. त्याचप्रमाणे इतर विरोधी

दडपणामुळे जर प्रे. आयूबना घटना शिथिल करून बेसिक डेमॉक्रसीचे क्षेत्रफळ वाढवावे लागले तर प्रे. आयूब ह्यांचे स्थान डळमळीत राहील. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करता व १९७० च्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी आपली उमेदवारी निश्चित न केल्याची त्यांनी वारंवार केलेली घोषणा लक्षात घेता कदाचित असे वाटते, की येत्या सर्वपक्षीय बैठकीत प्रे. आयूबखान अधिकाधिक सवलती जाहीर करून सैन्याचे राजकारणावरील वर्चस्व कमी करायचा प्रयत्न करतील. त्याचप्रमाणे प्रे. जॉन्सन ह्यांचा आदर्श पुढे ठेवन राजकारणातून सन्माननीयरीत्या निवृत्त व्हायचा प्रयत्न करतील. तसे केले तरच कदाचित पाकिस्तानातील आजच्या हिंसक दंगली शमतील. अन्यथा प्रे. आयूबचा मिर्झा-सुऱ्हावर्दी होणारच नाही ह्याची कोणी खात्री देऊ शकणार नाही. अर्थात पाकिस्तानात आयूब असोत की अशगरखान असोत, भुत्तो असोत की भसानी असोत, भारतविषयक धोरणात फारसा बदल होणार नाही; कारण ह्या सर्वांचे तत्त्वज्ञान भारत-द्वेषावरच आधारलेले आहे! एकच शक्यता–जर ह्या उग्र आंदोलनातून 'प्रत्येकी एक मत' ह्या तत्त्वावर नवीन लोकशाही जन्माला आली व सिंध, बलुचिस्तान, पूर्वपाक आदींना स्वायत्तता मिळाली, तर त्यातून कदाचित नवे लोकशाही नेतृत्व आकार घेईल व ह्या नेतृत्वाला भारताशी जमवून घेणे सोपे जाईल. पण एकंदर परिस्थितीचा आढावा घेता, हे काम कठीण दिसतंय !

## लोकशाहीची क्रूर चेष्टा

भारतात लोकशाही आहे का? लौकिक दृष्ट्या, जनतेने स्वतःच्या अमूल्य मताचे दान करून निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारा ह्या देशाचा राज्यशकट चालवला जातो म्हणून इथे लोकशाही आहे, असे म्हणणे क्रमप्राप्त आहे. परंतु मतदारांच्या मौलिक मतांच्या जोरावर, ती मते येन केन प्रकारेण स्वतःच्या पारडीत पाडून घेऊन निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधी संसदगृहात जे तमाशे करतात, ते पाहिल्यानंतर मात्र इथे लोकशाही नव्हे, लोकशाही नामक फार्स, मूठभर सत्तापिसाटांच्या, स्वार्थांधांच्या मर्जीनुसार चालवला जातो, असे मानण्यावाचून गत्यंतर राहत नाही. परवा हरियाना विधानसभेत जी चमत्कृतिपूर्ण घटना घडली तीवर साधी नजर टाकली तरी माझ्या वरील वाक्याचे प्रत्यंतर येईल.

काही दिवसांपूर्वी हरियाना सरकारवर भागवत दयाल शर्मांच्या बंडाळीमुळे गंडांतर आले होते. ते निभावताना अनेक आमदारांनी पक्षांतरांच्या उलट-सुलट कोलांट्या उड्या मारल्या होत्या. ह्याच वेळी ३१ जानेवारीच्या सुमारास, जोगिंदरसिंग ह्या स्वतंत्र पक्षीय आमदाराच्या कॉंग्रेस प्रवेशाची व त्यामुळे कॉंग्रेसची बाजू

अधिक बळकट झाल्याची बातमी आली. त्यानंतर दोन–चार दिवसांतच, ह्या आमदार महाशयांना पळवून नेल्याचे वृत्त विरोधी पक्षीयांनी प्रसृत केले. ६ फेब्रुवारीला श्री. जोगिंदर सिंग स्वतःच अगदी अनपेक्षितपणे सभागृहात हजर झाले. त्यांनी, स्वतःला पळवून नेण्यात आलेल्या प्रकाराची साद्यंत हकीकत जी सभागृहाला सांगितली, ती खरोखरच बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथेलाही लाजवील! त्यांना चुकीच्या बातम्या सांगून मुख्य मंत्री बन्सीलाल ह्यांच्या घरी फसवून नेण्यात आले, तिथे कोका–कोलातून त्यांना अंमली पदार्थ दिले गेले. त्यांच्याकडून त्या नशेत बन्सीलाल मंत्रिमंडळाला पाठिंबा दर्शविणाऱ्या पत्रावर सह्या करवून घेतल्या गेल्या व नंतर त्यांना राजकोट वगैरेकडे पळवून नेण्यात आले! ह्या कथेचा अर्थातच, बन्सीलाल यांनी इन्कार केला आहे. कदाचित् जोगिंदर सिंगही कोर्टात जातील. पण नुसत्या एवढ्याने भागणार नाही. सिंग ह्यांची कथा जर सत्य असेल तर, बन्सीलाल ह्यांनी सत्तेच्या स्वार्थापायी, लोकशाहीला अत्यंत घातक असे कृत्य, स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर करून केले आहे असाच त्याचा अर्थ होईल! आणि ही सारी कथाच कपोलकल्पित असेल, तर ज्या पवित्र मतपत्रिकेच्या जोरावर ते निवडून आले आहेत, त्या मताचाच हा फार गंभीर अपमान आहे. कारण 'मते' ही लोकशाही समाजाची एकमात्र देवता आहे! काही का असेना, हा साराच प्रकार अत्यंत निंद्य, गलिच्छ व मनाचा संताप करणारा आहे. ह्या प्रकाराची निःपक्षपाती चौकशी ताबडतोब करून गुन्हेगारांना शासन केले पाहिजे. देशात विशुद्ध लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा करायची असेल तर, राजकीय स्वार्थ नजरेआड करून केंद्राने ह्या प्रकरणाची संपूर्ण चौकशी त्वरित केली पाहिजे. ○


# पुरंदऱ्यांची नौबत

**ब. मो. पुरंदरे**

मूल्य साडेतीन. रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे २

।।।।। ।।।।।

## □ चलपती नकोच, 'चालू'पती हवा !

'मी पद्मभूषण सन्मान १९६७ साली नाकारला होता. परंतु १९६८ साली मला पुन: विचारण्यात आले व याला संमती देण्यासंबंधी माझे मन मी वळू दिले. संमती दिल्यापासून मला माझ्या या निर्णयाचा पश्चात्ताप होत होता. ज्या सन्मानाला मी कदाचित लायक नसेन अशा या सन्मानाचे ओझे बाळगण्यात मला काही मुद्दा दिसत नाही, आणि माझ्या व्यवसायात या सन्मानाने काही प्रोत्साहन मिळते आहे, असेही नाही. सर्वांच्याविषयी आदरभाव ठेवून, मी पद्मभूषण सनद व पदक परत करीत आहे. मला असे वाटते की अगदी दूरान्वयानेदेखील व्यवसायातील स्वातंत्र्यावर दडपण आणू शकणारे असे सन्मान, पत्रकार व्यवसायात असणाऱ्यांनी, स्वीकारू नयेत. विवक्षित मूल्यांच्या व आदर्शांच्या रक्षणासाठी हे तत्त्व सांगण्याची गरज असल्यानेच मी हे केले आहे.'

'नॅशनल हेरल्ड' या सुप्रसिद्ध पत्राचे संपादक श्री. चलपति राव यांचे हे निवेदन वाचून आम्हांला त्यांची कीव करावीशी वाटली. पहिली गोष्ट पद्मभूषणे आणि अवांतर भूषणे ही लायक माणसांना दिली जातातच, परंतु ती कमी लायक माणसांना दिली जातच नाहीत असे नाही. आपल्या देशात ते शक्य आहे काय ? आपण लोकशाही पत्करलेली आहे. लोकशाही मतांवर चालते. मते ही माणसांना असतात. माणसे ही जन्माने कुठल्यातरी जाती-जमातींची असतात. सर्व जाती-जमाती खूष राहतील या दृष्टीने सन्मान व बक्षिसे सर्व जातीजमातीत सारखी वाटली जाणे इष्ट असते. मालेगावच्या मुसलमान बंधूंनी नाही का नुकतीच तक्रार केली की — 'आमच्या गावात इतकी थोर थोर मुसलमान माणसे असताना त्यांना मात्र पद्मभूषण नाही, पद्मश्री नाही, काही नाही ! आम्ही याचा निषेध करतो !' मालेगावकरांचा राग योग्यच आहे. परंतु त्यांनी ही गोष्ट तूर्त लक्षात घ्यावी की राष्ट्रपतिपद डॉ. झकीर हुसेन यांना देऊन कॉंग्रेस सरकारने मुसलमान बंधूंना खूष केलेले नाही का ? त्यांच्याहून कर्तबगार आणि लायक, शिवाय राष्ट्रीय चळवळीत यातना भोगलेली कितीतरी माणसेदेखील या पदासाठी असताना, इंदिराबाईंनी डॉ. झकीर हुसेन यांचाच आग्रह धरला तो का ? मालेगावकरांनी जरा दम धरावा.

पुढचे राष्ट्रपती कदाचित त्या उपेक्षितांतच असतील. तात्पर्य, सरकारी सन्मान हे अनेक गोष्टी विचारात घेऊन द्यावे लागतात. चलपति राव यांनी मिळालेल्या सन्मानाचा जो गंभीर विचार केला तो करण्याची आवश्यकता होती असे आम्हांस वाटत नाही, ‘सकाळ’कार ना. भि. परुळेकर, ‘नवशक्ती’कार पां. वा. गाडगीळ यांच्यापेक्षा ‘नॅशनल हेरल्ड’चे संपादक स्वतःला तत्त्वाने चालणारे समजत असतील तर ते कुणीच मान्य करणार नाही.

आम्हांला असे कळते की, श्री. चलपति राव यांचा राग या गोष्टीवर आहे की, नालायक मंडळींना तोच सन्मान देऊन, सरकार पर्यायाने आमचा अपमानच करते! ही तक्रार भयंकर द्वेषमूलक आहे! इतकेच नव्हे तर टिकणारी नाही. सत्याची एवढी चाड आपल्या देशात असणे बरे नाही. शहरांत प्रतिपक्षाची २५-३० हजारांची सभा झाली तरी तिचा वृत्तांतही द्यायचा नाही व स्वतःच्या गल्लीबोळातल्या समारंभाचे फोटोसहित कौतुक छापायचे, अशा व्यवहाराने दैनिकाचे संपादक वागत नाहीत काय? पां. वा. गाडगीळ यांचे भारतातील कुठल्याही राजकीय पक्षाविषयीचे नक्की मत कुणी छातीठोकपणे सांगू शकेल काय? तेव्हा सरकारी सन्मानाशी विद्वत्तेचा, सत्याचा, तत्त्वाचा संबंध जोडण्याचे धाडस श्री. चलपति राव यांनी करण्याचे कारण नाही.

याबाबत साहित्यिकांचे उदाहरण त्यांनी डोळ्यांपुढे ठेवावे. एखाद्या ‘साहित्यिके’ला तिच्या पुस्तकाबद्दल बक्षीस मिळाले या आनंदापेक्षा, जिला काहीच लिहिता येत नाही असे तिचे मत जिच्याविषयी असते तिच्याही भिकार पुस्तकाला त्याच वर्षी तेवढेच बक्षीस मिळाले याचा विषाद इतका वाटतो की, अभिनंदन करायला गेलेला त्या लेखिकेचा चहाता तिचे सांत्वन करून परत येतो. परंतु असा अपमानही गिळता आला पाहिजे! हे दुःख गिळून साहित्यिक कधीही बक्षिसे परत करीत नाहीत. दुःख गिळता आले पाहिजे. श्री. चलपति राव यांना ते जमले नाही.

आता दूरान्वयाने का होईना पत्रकाराच्या व्यवहारातील स्वातंत्र्यावर दडपण येते, ही भीती श्री. चलपति राव व्यक्त करतात. दडपण येते ही गोष्ट खरी; परंतु पत्रकारांचेच दडपण सरकावर येते असे आमचे म्हणणे आहे. ब्रिटिश सरकारने विद्वानांना ‘सर’की दिली. जेव्हा जेव्हा ब्रिटिश सरकार काही अन्याय करी तेव्हा तेव्हा, ही विद्वान मंडळी सरकारची पदवी परत करीत व सरकारची बेअब्रू होत असे! इथे सरकारला अब्रू असावी हे गृहीत धरले आहे. तेव्हा सरकार जितक्या जास्त पदव्या देईल तितके सरकारवरचेच दडपण वाढत जायला हवे. तसे जर ते वाढत नसेल तर श्री. चलपति राव यांना नेमके काय म्हणायचे आहे ते कळत नाही!

बाकी, चलपति राव हुशार तर खरेच! त्यांनी पदवी स्वीकारून आपली योग्यताही सिद्ध केली आणि लगेच ती परत करून निस्पृहतेचा टेंभा मिरवण्याची सोय केली! आपल्याच सरकारला असे फसविणे हे बरे नाही. श्री. चलपति राव यांनी

परत केलेली पदवी, पुणे जिल्हा परिषदेच्या ठरावाप्रमाणे सरकारने उपयोगात आणावी असे आम्हांस वाटते.

वाटयाला आलेले सन्मान हे लायकीमुळेच येतात असे म्हणणे, म्हणजे गाडीच्या भरलेल्या डब्यात, खिडकीजवळची जागा गाडीत चढणाऱ्यांच्या सिनिऑरिटीप्रमाणे मिळते असे समजण्यासारखे आहे. याबाबतीत--

अनाधिकाराचेही नावे । जे वांटिया आले स्वभावे ।
ते भोगावे विधिगौरवे । श्रृंगारोनी ।।

हेच धोरण सुखद ठरते. राव, तुम्ही 'चालू'पति असणेच इष्ट होते !

## □ 'दया' त्याचे नाव !

हरियानात तूर्त काँग्रेस मंत्रिमंडळ पुन्हा अधिकारारूढ झाल्यामुळे तेथली झाकली माणके आता पुन्हा पूर्वीच्या तेजाने चमकू लागली आहेत. श्री. दया कृष्ण या विधिमंडळ काँग्रेस सभासदाने हरियाना विधानसभेत खालील ठराव आणला आहे —

'ज्या आई-बापांना तीनपेक्षा अधिक मुले होतील त्यांना सहा महिने सक्तमजुरी किंवा १,००० रुपये दंड किंवा सक्तमजुरी व दंड अशा दोन्ही शिक्षा देण्याची तरतूद कायद्यात करावी.'

या काँग्रेसी कृष्णाने तीन मुलांहून अधिक पोरांना जन्म देणाऱ्या आई-बापांना बिलकूल दया दाखवू नये यासाठी मांडलेला हा ठराव, विधिमंडळात विरोधी पक्षांनी सहकार्य न दिल्याने फेटाळला गेला हे खरोखर दुर्दैव होय. विरोधी पक्षांतील एका सभासदाने तर श्री. दया कृष्ण यांनाच स्वतःला दहा मुले असल्यामुळे त्यांनी प्रथम पत्नीसह तुरुंगात जावे व ३,००० रुपये दंड भरावा अशी मागणी केली. हा उद्धटपणा तर असत्य होय. श्री. दया कृष्ण यांना आपल्या पत्नीची दया आलेली नसली, तरी इतरांच्या बायकांची अधिक दया येणे हा सर्व नवऱ्यांचा लग्नसिद्ध हक्क आहे.

या कृष्णलीलेत आम्हांला एक उणीव वाटते ती अशी की, नवरा-बायको या दोघांना तुरुंगात टाकल्यानंतर पोरांचे हाल होतील, या दृष्टीने सर्व कुटुंबच तुरुंगात टाकणे अधिक चांगले नाही काय ? तुरुंगात वेळच्या वेळी खायला-प्यायला मिळाल्याने तुरुंगवासानंतर कदाचित नवऱ्याची प्रकृती सुधारण्याचा संभव आहे व हे पुढल्या काळात अधिक घातक ठरण्याची शक्यता आहे, तेव्हा फक्त बायकोला तुरुंगात टाकावे. स्वयंपाक हाताने करून व पोराबाळांच्या आंघोळी-पांघोळी सतत सहा महिने करून, शिवाय कामावर गेल्यावर साहेबांच्या शिव्या मिळू लागल्या, की नवऱ्याचा काटा चांगला ढिला झाल्याशिवाय राहील काय ?

'दया' ज्याचे नाव । काँग्रेसी हैवान । आणिक निर्दाळण पोरट्यांचे ।।

— ग्यानबा

# वीर

'साफ खोटं ! त्रिवार खोटं ! ! भारतानं पोर्तुगीजांचा गोवा जिंकला हे खोटं आहे,' या सरकारी वकिलांच्या विधानांचा मी धिक्कार करतो. गोवा भारताचा आहे. तो भारतानं मुक्त केला आहे. गोव्याचं पारतंत्र्य आता संपलं आहे.' संतापाने मुठी आवळीत आरोपीच्या पिंजऱ्यात हातात बेड्या असतानाही तो पासष्ठ वर्षांचा वृद्ध अक्षरशः कडाडला.

पोर्तुगालमधल्या त्या सर्वोच्च न्यायालयात क्षणभर वीज कडाडली. न्यायाधीश स्तंभित झाले. 'गोवा भारतानं अन्यायानं घेतला' या सरकारी वकिलांच्या विधानावर पिंजऱ्यात उभा असलेला आरोपी असा उद्दामपणे उसळेल असे कोर्टाला वाटले नव्हते. लिस्बनच्या त्या न्यायालयाच्या दगडी भिंतींना भेदून टाकणारा हा घनगंभीर आवाज उमटविणाराचे नाव तेलो मस्कारन्हस.

बिंदुमाधव जोशी

१८९९ साली गोव्यातील एका ख्रिस्ती कुटुंबात मस्कारन्हस यांचा जन्म झाला. त्यांचे कुटुंब अगदी पिढीजात गोव्यामधले. त्यांनी आपले दुय्यम शिक्षण पोर्तुगीज भाषेत

कसली माफी! कशाकरता! देशभक्ती गुन्हा असेल तर गुन्हेगार म्हणून कोणतेही हाल झेलण्यास मी तयार आहे. माझ्या देशाची परंपरा माफीची नाही. मला भीक नको. हक्क हवा.........

# तेलो मस्कारन्हस

गोव्यातच पूर्ण केले आणि मग या तरुणाला कायद्याचा अभ्यास करण्याची स्फूर्ती आली. त्यांनी १९२० साली पोर्तुगालमधील कोईज विद्यापीठात आपले नाव दाखल केले. या विद्यापीठात तेलो यांच्या जीवनातील एक योगायोगाची घटना घडली. पुढे पोर्तुगालचा हुकूमशहा झालेला सालाझार हा त्या वेळी विद्यापीठात मस्कारन्हस यांना अर्थशास्त्र शिकविण्यासाठी प्राध्यापक होता. त्याच्याशी पहिली ओळख झाली ती अशी. कायद्याची पदवी घेतल्यानंतर १९४८ पर्यंत मस्कारन्हस यांनी पोर्तुगाल मध्येच सरकारी खातयात नोकरी केली.

इतक्या वर्षांच्या या पोर्तुगालमधील वास्तव्यात हा भारतीय संस्कृती आणि स्वातंत्र्याचा अभिमानी स्वस्थ बसला नाही. मस्कारन्हस यांनी हिंदुस्थानवर या काळात अनेक पुस्तके लिहिली. या काळात त्यांचे गाजलेले पुस्तक म्हणजे "आमची हिंदू स्त्री". या पोर्तुगीज भाषेत लिहिलेल्या पुस्तकात त्यांनी सीता, दमयंती, यांची चरित्रे रसाळपणे वर्णन केली आहेत. रवींद्रनाथ टागोरांच्या कथांचे पोर्तुगीज भाषेतील एक भाषांतरित पुस्तकही त्यांनी प्रसिद्ध केले. ते धर्माने ख्रिश्चन असले तरी हाडाने हिंदू आहेत. आपल्या कॉलेज शिक्षणाच्या काळात स्वतःच्या खिशाला खार लावून या तरुणाने अनेक पुस्तके लिहून प्रसिद्ध तर केलीच; पण त्याबरोबर भारतीय संस्कृती आणि हा महान प्राचीन खंडप्राय देश यांची योग्य माहिती पोर्तुगीजांना व्हावी म्हणून त्याने एक मंडळ स्थापन केले. या मंडळाचे नाव होते, 'हिंदू असोसिए-

शन'—हिंदू मंडळ! या मंडळाचे तसे सभासद थोडे होते आणि ते सर्व ख्रिश्चन असले तरी हिंदू संस्कृतीचे प्रखर अभिमानी होते. या, 'हिंदू असोसिएशन'च्या नावावरूनही वादविवाद होत, पण मस्कारन्हस आपली ठाम भूमिका मांडीत. ते म्हणत, 'इंडियन' याचा अर्थ 'हिंदू' असाच मी लावतो आणि त्याचा मला अभिमान आहे. भारतीय संस्कृतीचा आणि स्वातंत्र्याचा प्रचार हा या मंडळाचा हेतू होता.

## नोकरीवर पाणी सोडले

१९४८ मध्ये मस्कारन्हस गोव्याला परत आले आणि गोवा सरकारच्या अन्य नोकरीच्या संबंधात ते मुंबईला येऊन राहिले. मुंबईला असतानाच गोव्याच्या स्वातंत्र्याची ऊर्मी त्यांना स्वस्थ बसू देईना. त्यांनी सरकारी नोकरीत असताना गोव्याचा गव्हर्नर सालाझार याला सडेतोड पत्र लिहिले आणि 'गोव्याला स्वयं-शासनाचा अधिकार द्या', अशी प्रभावी मागणी केली. या पत्राचा परिणाम व्हाव-याचा तोच झाला. मस्कारन्हस यांचे नाव पोर्तुगालच्या काळ्या यादीत लिहिले जाऊन त्यांना नोकरीवरून कमी करण्यात आले. त्यांची गोवा सरकारची नोकरी सुटलीच होती. पण या देशभक्ताला नोकरीची फिकीर होती कुठे! 'बरे झाले!' म्हणून त्यांनी परिस्थितीचे स्वागत केले आणि हे सतीचे वाण चालू ठेवले. मुंबईच्या वास्तव्यात त्यांनी 'रिसुअर्ज गोवा' (गोवा जागृत होत आहे) हे पोर्तुगीज भाषेतील साप्ताहिक प्रसिद्ध केले. या साप्ताहिकातून त्यांनी गोव्याचे भारतात विलिनीकरण झाले पाहिजे, म्हणून सतत मागणी प्रभावी ठेवली. गोमांतकाच्या स्वातंत्र्याची चळवळ ही भाडोत्री लोकांची चळवळ आहे हा पोर्तुगालचा प्रचार त्यांनी आपल्या प्रभावी लेखणीने मोडून काढून गोमांतकाची चळवळ म्हणजे गोमांतकीय आणि भारती-यांच्या देशभक्तीतून उभा राहिलेला संग्राम आहे, याचे प्रभावीपणे प्रतिपादन केले.

१९५५ ते १९५८ पर्यंत त्यांनी भारतीय आकाशवाणीवर पोर्तुगीज भाषेच्या शाखेचा प्रमुख म्हणून काम केले. या काळात ते आकाशवाणीवर पोर्तुगीज भाषी लोकांना भारतीय संस्कृतीचे महत्त्व पटवून देत असत. जरी त्यांची मुंबईतील ही नोकरी चालू होती तरी या नरवीराचे सर्व लक्ष लागले होते गोमांतकाकडे. मंगे-शीच्या या पावनभूमीत मी कधी पाऊल टाकीन आणि या भूमीच्या स्वातंत्र्याच्या जयजयकाराचे ध्वनी अस्मानात कधी उमटवीन असे त्यांना झाले होते. १९५९ साली गोमांतकातील पोर्तुगीज सत्तेने ज्यांनी हिंसात्मक कार्य केले नाही, अशा राजकीय कार्यकर्त्यांना आणि सत्याग्रहींना एक सार्वत्रिक माफी जाहीर केली. झालेल्या माफीचा फायदा घ्यावा आणि गोमांतकात स्थायिक होऊन आपले कार्य पुढे चालवावे म्हणून मस्कारन्हस यांनी आपल्याला माफी झालेली आहे याची खात्री करून घेऊन गोव्याच्या भूमीवर पाऊल ठेवले.

पण या स्वातंत्र्ययोद्ध्याचा अंदाज चुकला. सालाझारची घोषणा म्हणजे सैता-नाच्या तोंडचे बायबल होते. गोव्याच्या भूमीवर या देशभक्ताने पाय ठेवताच पोर्तु-

गीज सर्पाने डंख मारला. मस्कारन्हस यांना अटक करण्यात आली आणि गोव्याच्या तुरुंगात तीन महिनें डांबून त्यांचे हाल करण्यात आले. पण 'पिचेल मनगट परी उरातील अभंग आवेश !' या जिद्दीने या स्वातंत्र्यवीराने सर्व हाल पचविले. शेवटी गोवा सरकारने तीन महिन्यांच्या या यमयातनेतून त्यांना मोकळे केले आणि 'तुम्हांला गोव्यात राहता येणार नाही. पोर्तुगालमध्येच राहावे लागेल', असा हुकूम त्यांच्यावर बजावण्यात आला. तुरुंगात का होईना, पण भारताच्या भूमीवर राहण्यात आनंद मानणाऱ्या या सुपुत्राला भारतमातेच्या कुशीतून जबरदस्तीने ओरबाडून काढून पोर्तुगाला नेऊन सोडण्यात आले. पोर्तुगालमध्ये तुम्हांला मोकळे सोडले आहे, असे त्यांना सांगण्यात आले.

पोर्तुगालमध्ये मस्कारन्हस मोकळे होते. पण फक्त एक वर्ष ! कारण पोर्तुगीज सरकारने, त्यांना देण्यात आलेल्या सर्व सवलती आणि आश्वासनांना काळीमा फासला आणि १४ नोव्हेंबर १९६० रोजी अगदी भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंच्या वाढदिवशी लिस्बनच्या तुरुंगात या भारताच्या थोर देशभक्ताच्या हातापायांत वयाच्या ६१ व्या वर्षी बेड्या ठोकण्यात आल्या. भारताच्या राजधानीत पंतप्रधानांच्या वाढदिवसाच्या मेणबत्त्या पेटविल्या जात होत्या तर पोर्तुगालच्या राजधानीत एका भारतीय सुपुत्राच्या जीवनाची ज्योत मालविली जात होती !

## देशभक्तीची चिनगारी

१९६२ च्या जूनमध्ये जुन्याच आरोपांवरून पोर्तुगीजांच्या न्यायालयात मस्कारन्हस यांच्यावर खटला सुरू झाला. अनेकांनी सांगितले, 'मस्कारन्हस, माफी मागा, तुम्हांला सोडण्यात येईल.'



माफी !

कसली माफी ? कशाकरिता ! देशभक्ती हा गुन्हा असेल तर गुन्हेगार म्हणून कोणतेही हाल झेलण्यास मी तयार आहे. माझ्या देशाची परंपरा माफीची नाही. मला भीक नको. हक्क हवा !

आणि मस्कारन्हस यांनी खटला सुरू होण्याअगोदरच न्यायालयात अर्ज दिला, 'मी पोर्तुगीज नागरिकत्व फेकून देत आहे. मी भारतात जन्मलो आहे. माझे आई-वडील भारतीय आहेत. माझ्यावर भारतीय संस्कृतीचे संस्कार झाले आहेत. माझ्या रक्ताचा थेंब अन् थेंब भारतीय आहे म्हणून मला भारतीय नागरिकत्व मिळाले पाहिजे.'

मस्कारन्हस यांच्या या मागणीने पोर्तुगीज सरकार खवळले. आपल्या मागणीचा परिणाम काय होणार, हे त्यांनाही पक्के ठाऊक होते. मोडेन पण वाकणार नाही या हिंमतीने हा ६२ वर्षांचा भारतीय भीष्माचार्य कणा ताठ ठोकून उभा राहिला. खटल्याचा निकाल लागल्यासारखा होता आणि एके दिवशी सरकारी वकिलांच्या विधानावर चिडून जाऊन भरकोर्टात, 'गोवा भारताचा आहे. पारतंत्र्यात असणारा गोवा भारतानं मुक्त केला," या मस्कारन्हसच्या सिंहगर्जनेने पोर्तुगाल न्यायालयाने चिडून जाऊन या श्रेष्ठ देशभक्ताच्या मस्तकात शिक्षेचा शेवटला खिळा ठोकला.

'२४ वर्षे शिक्षा.'

दोन तपे अंधारकोठडी आणि दंडाबेडीत हा स्वातंत्र्यवीर जखडला गेला.

आज मस्कारन्हस यांचे वय ७० वर्षांचे. शेवटी एकदा तरी मी माझे थकले भागले पाय मंगेशीच्या पवित्र भूमीत ठेवीन. पांढऱ्या मस्तकावर काळ्या आईची धूळ उधळून घेईन, नाचेन, या आशेने डोळ्यांत प्राण आणून हा वृद्ध लिस्बनच्या दगडी भिंतीमागे एक एक दिवस कंठतो आहे. हृदयरोगाने त्यांना गाठले असले तरी माझे देशबांधव मला विसरणार नाहीत, ह्या हृदयातील श्रद्धेने त्यांना जिवंत ठेवले आहे. मस्कारन्हस यांचा एक एक श्वास बोलतो आहे :

'श्वासांनो जा वायूसंगे ओलांडून भिंत
अन् सांगा अमुच्या आईला हृदयातील खंत'

वीर मोहन सुटला. आता वीर मस्कारन्हसच्या सुटकेसाठी कटिबद्ध होऊ या. □

**[ वीर मोहन रानडे यांच्याशी केलेल्या ध्वनिमुद्रित चर्चेच्या आधारे. ]**

# फॉस्फोमिन -





अधिक उत्साह देते. भूक वाढविते. जोम वृद्धिंगत करते. शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते.






खरोखर!...
फॉस्फोमिन म्हणजे
घरकुलांतील
आरोग्याचे कारंजे!

व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस्युक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB

® हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50 A/67 Mar

ट्रॅक्टर आणि बॉयलर
चंद्रशेखर मराठे

# कापूस उत्पादनवाढीची समस्या

भारतीय शेती हा परंपरेने निर्वाह-पातळीवर चालणारा व्यवसाय आहे. पण गेल्या तीन वर्षांच्या अवधीत संकरित बियाणांच्या योगे या व्यवसायाचा कायापालट होण्याची चिन्हे दिसत असून तो किफायतशीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शेतीमध्ये अधिकाधिक गुंतवणूक करण्याचा व त्यासाठी भांडवलपुरवठा निर्माण करण्याचा प्रश्नही या परिवर्तनामुळे अधिक निकडीचा व व्यापक झाला आहे.

पारंपरिक पद्धतीने चालणाऱ्या शेतीस भांडवल कमी लागते. मात्र आधुनिक शेतीस सुधारलेले बियाणे, खते, जंतुनाशके, अवजारे, छोटी मोठी यंत्रसामग्री, मालाचा साठा करण्याच्या व विक्री करण्याच्या आधुनिक सोयी या साऱ्यांसाठी भांडवल अधिक लागते. उत्पादकता व उत्पादन यांत वाढ झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्ज घेण्याच्या ताकदीतही वाढ झाली आहे.

भारतीय शेतकऱ्याला सावकाराच्या मगरमिठीतून सोडवण्यासाठी आजवर सहकारी व सरकारी यंत्रणा यांच्याद्वारे प्रयत्न होत होते. या प्रयत्नांनीही आजतागायत भारतीय शेती-भांडवलाच्या स्वरूपात फारसा बदल झालेला नाही, हे सत्य खालील तक्त्यावरून उघड होईल.

| कर्ज देणारा घटक | १९५१–५२ | १९६१–६२ |
|---|---|---|
| | (एकूण कर्जाशी प्रमाण) | |
| सरकार | ३·३ टक्के | २·५८ टक्के |
| सहकारी यंत्रणा | ३·१ ,, | १५·५६ ,, |
| व्यापारी बँका | ०·९ ,, | ०·५८ ,, |
| जमीनदार | १·५ ,, | ०·५८ ,, |
| शेतकऱ्यांचे सावकार | २४·९ ,, | ३५·९८ ,, |
| इतर सावकार | ४४·८ ,, | १३·१६ ,, |
| व्यापारी व अडते | ५·५ ,, | ८·८२ ,, |
| नातेवाईक | १४·२ ,, | ८·८२ ,, |
| इतर | १·८ ,, | १३·९२ ,, |
| | १०० टक्के | १०० टक्के |

या वर्गवारीवरून काही ढोबळ निष्कर्ष निघतात ते असे :

(१) शेती भांडवलातील सरकारचा वाटा घसरला. (२) सहकारी यंत्रणेचा एकूण कर्जातील वाटा वाढला तरी सावकाराचा वाटा कमी झालेला नाही. शेतकऱ्यांच्या सावकारांचा वाटा वाढला व इतर सावकारांचा कमी झाला. हा बदल केवळ तांत्रिक असून शेतीभांडवलाच्या मूलभूत स्वरूपात त्याने बदल झालेला नाही.

(३) व्यापारी/अडत्ये यांच्याकडून शतकरी जास्त प्रमाणांत पैसे घेऊ लागला.
(४) 'इतर' या मोघम नावाखाली चाललेला कर्जपुरवठा बऱ्याच प्रमाणांत वाढला.
(५) शेती भांडवल-पुरवठ्याचे मूलभूत स्वरूप फारसे बदललेले नाही व सहकारी कर्जपुरवठा प्रामुख्याने सहकारी साखर व अन्य कारखान्यांमुळे वाढलेला दिसतो. छोट्या छोट्या जिराईत शेतकऱ्यांस अद्याप सावकार व अडत्ये यांच्यावरच अवलंबून राहावे लागते.

आता या क्षेत्रात व्यापारी बँका मोठ्या प्रमाणावर पदार्पण करतील असा रंग दिसतो. सामाजिक नियंत्रण उपाययोजनेचे ते एक महत्त्वाचे अंग आहे. याबाबत एक सर्वसाधारण गैरसमज दिसतो तो असा की, बँका त्यांच्याजवळचे सध्याचे पैसे शेतीक्षेत्रांत वाटू शकतील, हे खरे नाही. बँकांचे सध्याचे पैसे औद्योगिक कर्जात व सरकारी रोख्यांत अडकले आहेत. बँका ग्रामीण भागांत ठेवी गोळा करतील तेव्हाच त्या शेतीसाठी कर्जे देऊ शकतील. म्हणजे या घटकांद्वारा शेतीक्षेत्रात नव्याने पैसा येण्याची फारशी शक्यता नसून ग्रामीण क्षेत्रातील बचतीचेच अधिक उत्पादक स्वरूपाचे फेरवाटप त्यांनी करावे अशी अपेक्षा आहे.

हे कार्यही जेवढे दिसते तेवढे बिनमहत्त्वाचे नाही. ग्रामीण भागातील बहुतेक बचत सोन्यानाण्यांत अडकलेली आहे वा अनाठायी खर्चात उधळली जात आहे. तेथील जनतेस हा खर्च अनाठायी वाटत नाही, याचे कारण तेथील जीवनमानच आजवर एकसुरी व किमान पातळीवरचे राहिले आहे. त्यामुळे प्रसंगोपात्त येणारे आनंदाचे कौटुंबिक प्रसंग जरा सढळ हाताने साजरे करावेत असे ग्रामीण मंडळींस वाटले तर कोणी कुरकूर करण्याचे कारण नाही.

मात्र यांपैकी काही भाग तरी शेतीमधील उत्पादक गुंतवणुकीकडे वळल्याखेरीज शेतीक्रांती यशस्वी होणार नाही. बँकांचे हेच काम आहे. बचतीचे फेरवाटप नेहमीच होत असते. ते होताना त्यात उत्पादनास साहाय्य करण्याची शक्ती येणे हे महत्त्वाचे आहे. सहकारी चळवळीने हे केलेले नाही, हे उघड आहे. कर्ज मिळण्याचे स्थान यापलीकडे सोसायटीस खेड्यात काहीही स्थान नाही.

सोसायटीकडून कर्ज घेतलेला शेतकरीदेखील आपला माल सहकारी संस्थेमार्फत न विकता अडत्यांमार्फत विकतो. आपणांस मिळणारे कर्ज कोणाच्या तरी बचतीतून मिळते हे त्याला ठाऊकच नाही. बचत आणि गुंतवणूक यांचा घनिष्ट संबंध त्याच्या लक्षात आणून देण्यास व्यापारी बँका यशस्वी ठरल्या तर बरेच काम होईल.

जमिनीस पाणी मिळण्यासाठी अगोदर धरण बांधून पावसाचे पाणी एकत्र करावे लागते वा विहीर खोदण्याचे कष्ट घ्यावे लागतात, हे ज्या सहजपणे शेतकऱ्याच्या लक्षात येते त्याच सहजपणे त्याला गुंतवणुकीसाठी बचत आवश्यक आहे हे पटले पाहिजे. व्यापारी बँकांनी ग्रामीण भागांत जास्त शाखा काढणे व सुरुवातीसच शेतकऱ्याला नियमांच्या जंजाळात जखडून न टाकता त्याची सोय पाहणे हे महत्त्वाचे आहे. ○

# महाराष्ट्रातील धार्मिक पंथांचे कार्य

**प्रा. कुलकर्णी** : भारताच्या गेल्या हजार एक वर्षांच्या इतिहासाकडे पाहिले तर त्या सर्वांमध्ये आम्हा मराठयांचा एक वेगळेपणा तत्काळ नजरेत भरतो. सनातन वैदिक धर्म 'ऑक्टोपस' प्रमाणे सर्वसमावेशक आणि सर्वस्पर्शी असल्यामुळे त्याच्या तत्त्वप्रणालीचा पराभव करणे हे जगातील कोणत्याही तत्त्वप्रणालीला कधीच शक्य झाले नाही. मात्र मुळात विजिगीषू आणि पौरुषप्रधान अशा वैदिक धर्माच्या ऱ्हासकालात जी नानाविध परिवर्तने होत गेली, त्यामुळे धर्म शबल झाला. कर्मकांडाचे प्राबल्य अतोनात वाढल्यामुळे धर्मपुनरुज्जीवनाच्या अनेकविध चळवळी बुद्ध, महावीर, गहिनीनाथ यांसारख्या श्रेष्ठ व्यक्तींनी प्रसंगी वैदिक धर्माविरुद्ध बंडाचा झेंडा उभारूनही उभ्या केल्या. त्यामुळे स्थळकालानुरूप आपल्या धार्मिक आचारविचारांत स्थित्यंतरे जशी झाली तशीच या नवीन निघालेल्या बंडखोर धर्मप्रणा-

लींचाही पाडाव करण्याचे कार्य शंकराचार्यादिकांनी केले.

इसवी सनाच्या १२–१३ व्या शतकापासून महाराष्ट्रातील धार्मिक संप्रदायांनी हेच धर्मपुनरुज्जीवनाचे महत्त्वाचे कार्य केले. आमचे सारे स्मृतिग्रंथ म्हणतात की, जे कर्म अथवा अकर्म निःश्रेयस्कर असेल ते धर्म. निःश्रेयस म्हणजे अत्यंत श्रेष्ठ प्रतीचे सुख. म्हणजेच आपली धर्मकल्पना ही समाजाचे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तिमात्राचे कल्याण करण्यासाठी, त्याला आध्यात्मिक व प्रापंचिक सुखाची प्राप्ती करून देण्याकरिता उदयाला आली आहे; आणि तिने जीवनाच्या सर्व क्षेत्रांत एक पद्धत, एक निष्ठा, एक जीवनप्रणाली निर्माण केली आहे. महाराष्ट्राच्या धार्मिक पंथांचे कार्य पाहिले तर या सर्व पंथांनी महाराष्ट्र घडवण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे. या पंथांतील सर्वांत जुना असा संप्रदाय म्हणजे नाथसंप्रदाय होय. त्याच्या कार्यासंबंधी विलास कुलकर्णी हे काय म्हणतात ते पाहू.

**विलास कुलकर्णी :** नाथसंप्रदायाचा विचार करताना त्यापूर्वीच्या भारतीय साधनामार्गांचा विचार केला पाहिजे. १० व्या व ११ व्या शतकांच्या सुमारास भारतीय साधनेने एक निराळे स्वरूप धारण केले. हा काळ म्हणजे बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची अखेरची अवस्था होती. या काळात बौद्धांनी तंत्रसाधना स्वीकारली. त्याचा प्रकर्ष हिंदूंतही झाला. या तंत्रसाधनात सर्वत्र अनेक यौगिक प्रक्रिया होत्या. तांत्रिकांच्या प्रभावा-

प्रा. भीमराव कुलकर्णी
व
पुणे विद्यापीठातील
एम्. ए. चे चार विद्यार्थी
श्री. विलास कुलकर्णी
कु. शोभा मांडके
सौ. विद्युत भागवत
व कु. मीरा पारिपत्यदार
यांनी
आकाशवाणी
पुणे केंद्रावरून
व्यक्त केलेले विचार.



पासून दूर असलेल्या साधनाप्रणालीतही योगावर भर होता. योग हे तत्कालीन भारतीय साधनेचे साधारण वैशिष्ट्य बनले होते. अनेक प्रयोगांनी योगप्रक्रियेत भर पडत होती. या काळात शैव संप्रदायाचा प्रसार असला तरीही साधनामार्गात ' शिवा ' ऐवजी ' अशिवा 'लाच प्राधान्य होते. म्हणजे तंत्रमार्गातील सर्व घृणास्पदत शिवाराधनेच्या नावाखाली चालू राहिली होती.

या साधना प्राधान्याने वामाचारी यौगिक प्रक्रियांसाठी असत, त्यांत स्त्री हे आवश्यक साधन बनले होते. गोरक्षनाथाने या पार्श्वभूमीवर योग वगैरे वैशिष्ट्यांचा समन्वयाच्या दृष्टीने स्वीकार केला आणि विषय प्राधान्याचा धुव्वा उडवून योग-प्रधान शिवयुक्त अनुभूतींना प्रमाण मानणारा बाह्याचारविरोधक असा नाथ-संप्रदाय प्रस्थापित केला.

या संप्रदायाने धर्माच्या नावाखाली चाललेल्या वाममार्गी तंत्रसाधनेचा पराभव केला. म्हणजे एका प्रकारे, एकंदर भारतीय योगसाधनेला शुचिता, पावित्र्य यांचे स्वरूप दिले. धर्माच्या बुरख्याखाली दडलेल्या अनैतिक कर्मकांडाला विरोध करून आंतरिक शुद्धतेवर भर दिल्यामुळे व लोकांच्या उत्कर्षासाठीच प्रयत्न केल्यामुळे हा धर्म प्रभावी ठरला.

लोकांच्या उद्धाराची जाणीव असल्यामुळ त्यांनी धर्मप्रसारासाठी लोकभाषांचा आणि व्यवहारी आचारांचा स्वीकार केला. त्यामुळेच नाथसंप्रदायाचा प्रसार होऊन पुढच्या काळातल्या अनक पंथांना तो प्रेरक ठरला. त्यांनी आत्मप्रामाण्यावर भर दिला असला तरी शास्त्रवचनांना विरोध केला नाही. योगाचा महिमा सांगताना कधी भक्तीची निंदा केली नाही. स्त्रीला त्यांनी साधनेचे स्वातंत्र्य दिले असले तरी बौद्ध किंवा पुढच्या काही पंथांत घडलेल्या मठांतील अनाचाराला प्रवेश दिला नाही. अर्थात अशा प्रकारे समन्वय करीत असताना दोन धोके नेहमी असतात. एक म्हणजे समन्वयालाच ' सवगोलंगार ' असे स्वरूप येते. नाथसंप्रदायात ते झाले नाही. दुसरा म्हणजे स्वतःच्याच पंथाच्या मूळ सिद्धांत, विचार, आचार यांच्यावरचो निष्ठा ढळते. नाथसंप्रदायात तसेही घडले नाही. स्वतःच्या सिद्धांतावर निष्ठा असली तरी ' साधनानां अनेकता ' हे तत्त्व ते विसरले नाहीत. त्याचमुळे नाथ-संप्रदायाने समकालीन सर्व साधनाप्रणालींचा सुयोग्य समन्वय करून विशुद्ध साधनेचा भारतव्यापी प्रवाह निर्माण केला.

यानंतरचा विचार करण्यासारखा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे महाराष्ट्रातच नाथ-संप्रदायाचा अधिक प्रभाव का पडला हा आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे आद्य शिल्पकार ज्ञानेश्वर यांच्या भावनिक व वैचारिक आंतरजीवनाचे पोषण नाथ-संप्रदायाच्या तत्त्वज्ञानावरच झाले आहे. ते अद्वयानंदवैभवाचेच वारसदार आहेत. महाराष्ट्रातील महानुभाव, दत्त, वारकरी, समर्थ या साधनासंप्रदायांवर नाथांचा प्रभाव पडला याचे कारण या सर्वांच्या अगोदर नाथसंप्रदायाचा उदय आणि विकास

झाला होता. 'आद्यत्व आणि महनीयत्व' हे दोन्ही गुण यात साठवले होते. म्हणजेच महाराष्ट्रात जे धर्मप्रवर्तन घडले त्याच्या खुणा बऱ्याच प्रमाणांत नाथसंप्रदायात सापडतात असेच म्हटले पाहिजे.

**प्रा. कुलकर्णी :** मग त्या प्रभावाच्या खुणा ओळखून इतर धर्मपंथीयांचे कार्य त्या दृष्टीने पाहिले पाहिजे. महानुभावांच्या बाबतीत तुम्ही काय सांगताय, मांडके ?

**शोभा :** तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात यादवकालीन राजवटीत महानुभाव पंथाच्या रूपाने एक नवा पंथ निर्माण झाला. त्याचे स्वरूप पाहिले तर त्यांच्यावरील नाथप्रभाव लक्षात येतो. महानुभावांचे आद्यगुरू चक्रपाणी व त्यांचे शिष्य 'गोविंद प्रभू' हे आदर्श नामयोगी होते. धर्मसंस्थापक चक्रधर यांच्यावरही नाथपंथाचा खूपच प्रभाव दिसतो. त्याच्या सूक्ष्म खुणा त्यांच्या वागण्या-बोलण्यांतून लक्षात येतात. 'नाथवाणी ने निकी' असेच त्यांचे मत होते. चक्रधरांची दृष्टांतपद्धती नाथवाङमयाला जवळची आहे आणि चक्रधरांच्या बोलण्याचालण्यांतून नाथपंथीय योग्यांबद्दल पराकाष्ठेचा आदर दिसतो. पण नाथांनी हठयोगावर दिलेला भर सामान्यांच्या कुवतीला पेलणारा नव्हता. शिवाय महानुभावांनी ज्या काळात आपल्या पंथाची स्थापना केली तो काळ वैदिक धर्मातील असंख्य देवतांच्या बुजबुजाटाचाच होता. त्यात श्रेष्ठ कनिष्ठ कोण यावर वादंग माजले होते. त्यामुळे सर्वात्मक, सर्वकर्ता व नित्यमुक्त अशा एकाच परमेश्वराची भक्ती करावयास सांगून आपला दृढमार्ग वेगळा केला. वैदिकधर्मात मोक्षाचा अधिकार सर्वांनाच नव्हता. चातुर्वर्ण्यावर आधारलेले त्यांचे पंथीय तत्त्वज्ञान—पण चक्रधरांनी चातुर्वर्ण्य अमान्य करून पंथप्रवेश सर्वांनाच खुला ठेवला व स्त्रीशूद्रांपासून सर्वांनाच मोक्षाचा अधिकार दिला.

महानुभावांच्या एकविधाभक्तीमुळे बाकीच्या देवदेवता, व्रतवैकल्ये आणि तीर्थयात्रा त्यांनी त्याज्य ठरविल्या. महानुभावपंथाचे संस्थापक श्री. चक्रधरस्वामी यांचे तत्त्वज्ञान अनेक दृष्टींनी क्रांतिकारक होते. परंपरेशी बंड पुकारून एक नवी समाजरचना, एक नवे तत्त्वज्ञान आणि एक नवा ईश्वरविषयाचा विचार प्रसृत करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. कोणत्याही समाजरचनेच्या संदर्भात चक्रधरांसारख्या प्रेषिताची दृष्टी फार क्रांतिकारक असेल तर त्याचा पराभव अटळ असतो. त्याप्रमाणे चक्रधरांच्या या नव्या धर्मपंथाचे झाले. महानुभावांचा पराभव, त्यांच्या आत्यंतिक निवृत्तिवादामुळे झाला. याबाबतीत त्यांच्यावर झालेला जैन व बौद्ध संप्रदायांचा परिणामही महत्त्वाचा आहे. महानुभावीयांनी अहिंसा आणि संन्यास यांना फार महत्त्व दिले. म्हातारपणी संन्यास घेणे म्हणजे ईश्वराला फसविण ही चक्रधरस्वामींची प्रमुख विचारसरणी आहे. शरीराचे, जिभेचे, वासनांचे कसलेही चोचले पुरवायचे नाहीत; स्वदेश, स्वग्राम, स्वजनसंबंध त्याज्य मानावे, नवे वस्त्र नेसू नये; मार्गी पडलेले वस्त्र घ्यावे, भिक्षेवर जगावे, परंतु भिक्षा मागताना मात्र घरे निवडू

नयेत, देशाच्या शेवटी झाडातळी जन्म क्षेपावे–अशा प्रकारे निवृत्तीच्या एका टोकास गेलेल्या या धर्माची आचारतत्त्वे निरुपयोगी तर आहेतच, पण सगळयांना आचरण्याच्या दृष्टीने कठीण आहेत. पण त्याबरोबरच कर्मकांडांत व अज्ञानपंकांत रुतलेल्या समाजाला चक्रधरांनी परमेश्वरप्राप्तीचा अत्यंत उदात्त मार्ग दाखविला हेही खोटे नाही. त्यांचा निवृत्तिमार्ग अतिशय डोळस आहे. निवृत्तीचा उद्‌भव ज्ञानातून व्हायला हवा. ' ज्ञानेविण वैराग्य ते काय करावे बापेया ', असे चक्रधर म्हणतात. त्याच्या पुढची पायरी म्हणून चक्रधरांनी ' ज्ञानापसी प्रेम उत्तम ' असे म्हटलेले आहे आणि या जगात ' परमेश्वरु एक सोडविता ' ही निष्ठा त्यांनी प्रत्येकाच्या मनात बिबवून कर्मकांडाच्या आडंबराला मोठाच धक्का दिला आहे. महानुभाव वेद-चातुर्वर्ण्य मानत नसले तरी महाराष्ट्रामध्ये त्यांनी वाङमय निर्मितीच्या दृष्टीने मराठी भाषा आणि वाङमय यांच्यामध्ये कितीतरी परंपरांचे पाट आणून सोडले. महानुभाव हा भक्तिमार्गी संन्याशांचा पंथ असल्यामुळे त्यांनी भारतभागवतातील भक्तिमार्गाचा एका नव्या दृष्टिकोणातून पुरस्कार केला. मराठी भाषेच्या ज्वलन्त अभिमानातून कटाक्षाने त्यांनी मराठीत अलौकिक ग्रंथरचना केली. चक्रधरांच्या वचनाधारे त्यांनी केलेली ग्रंथरचना संस्कृत भाष्यपरंपरेशी जुळते. मराठीतील पहिले व्याकरण महानुभावीयांचेच आहे. त्यांचे सातीग्रंथ पाहिले तर संस्कृत पंचकाव्याचा तो नितांतसुंदर, प्रौढ आविष्कार वाटतो. चक्रधरांच्या लीळा गोळा करण्याच्या बाबतीतील त्यांची निष्ठा ही आजच्या पाश्चात्य इतिहासकारांसही लाजवील अशा स्वरूपाची आहे. आणि लीळा चरित्रासारखे महानुभावीय गद्यग्रंथ पाहिले तर मराठी भाषेचे केवढे वैभव आपल्यासमोर उलगडले आहे हे लक्षात येते.

एकंदरीत निवृत्तिमार्गाचा पुरस्कार करणाऱ्या या पंथाची वाङमय निर्मितीची सर्वंकष दृष्टी आजच्या विज्ञाननिष्ठ दृष्टिकोणाच्या बुद्धिमंतांनाही लाजवील इतकी प्रवृत्तिपर आहे आणि त्यामुळे मराठी भाषेच्या आद्यावस्थेत मराठी अत्यंत भावसंपन्न, विचारसंपन्न होण्यास मदत झाली.

**प्रा. कुलकर्णी** : महानुभाव वाङमयाने धार्मिकदृष्टया अवैदिकत्व पत्करले आणि त्यामुळे तो मोठ्या प्रमाणात फोफावू शकला नाही. परंतु धार्मिक परंपरा तत्कालिन सामाजिकतेच्या संदर्भात ज्यांनी वारकरी संप्रदायाने जोपासली त्यातून पुढे महाराष्ट्रधर्म उदयाला आला. वारकरी संतांच्या या कार्याचे विवेचन आता सौ. भागवत चांगल्या रीतीने करू शकतील.

**सौ. भागवत** : महाराष्ट्रात वैदिक धर्मांतर्गत जे अनेक पंथ आहेत त्यांपैकी ज्याने महाराष्ट्राचा बराचसा भाग व्यापला आहे असा हा वारकरी पंथ. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील भागवतधर्मीय संतांचे कार्य फार महत्त्वाचे आहे. म्हणूनच आज ६००-७०० वर्षांनंतरही त्यांचा फार मोठा पगडा महाराष्ट्रावर दिसतो. वारकरी पंथ हा वैदिक धर्माच्या तत्त्वांशी अतिशय जुळते घेणारा पंथ

आहे. मराठी संस्कृती, मराठी मन, मराठी भक्तिभाव खऱ्या अर्थाने या वारकरी पंथाने जोपासला आहे. वैदिक संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचे इतके सर्वांगीण, इतके व्यापक स्वरूप शोधूनही सापडणार नाही. वैयक्तिक व प्रापंचिक सुखदुःखांत रममाण झालेल्या तत्कालीन समाजाला समाजनिष्ठ अशा कर्तव्यबुद्धीची प्रेरणा देऊन महाराष्ट्राची अस्मिता या पंथस्थापनेच्या रूपाने ज्ञानेश्वरांनी जागृत केली. अद्वैतभक्ती हे या पंथाचे ध्येय असून सामाजिक जीवनात चातुर्वर्ण्याची चौकट जशीच्या तशी स्वीकारून परमार्थात मात्र 'जे जे भेटे भूत ते तें मानिजे भगवंत।' अशी निष्ठा येथे बाळगलेली दिसते. ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथातील साध्याभोळ्या भक्तीला अध्यात्मनिष्ठ मानवतावादाची बैठक मिळवून दिली आणि रूढीपेक्षा मानवतेला, शब्दप्रामाण्यापेक्षा अंतःस्फूर्तीला महत्त्व दिले. अर्थातच असे करताना मूर्तिभंजकाची आत्यंतिक भूमिका स्वीकारून त्यांनी समाजजीवनाचा पाया उद्ध्वस्त होऊ दिला नाही. या पंथाचे प्रमुख ध्येय म्हणजे सिद्धावस्थेनंतरही कर्मशीलता हे आहे. 'शिवोऽभूत्वा शिवं यजेत्।' स्वतः मुक्त होऊन जगास मुक्तीचा मार्ग सांगणे म्हणजे 'अवघेचि त्रैलोक्य आनंदाचे आवारू' करण्याचा हा त्यांचा विश्वव्यापी प्रयत्न होता. ज्ञानेश्वरांनी आपल्या तत्त्वनिरूपणात सगुणनिर्गुणाची बेमालूम सांगड घातलेली दिसते. शैवांची निष्ठा व तपश्चर्या त्यांनी स्वीकारली. पण त्यांची आक्रमक वृत्ती घेतली नाही. वैष्णवांची सात्त्विकता व विश्वबंधुत्व हे आंतरिक गुण घेतले पण प्रतिकादी बाह्यांगांचे स्तोम माजू दिले नाही. यामुळेच वारकरी पंथ वैशिष्ट्यपूर्ण वाटतो. ज्ञानेश्वरप्रणित भागवतधर्माचा संदेश अक्षरशः भारतभर पोहोचविण्याचे कार्य नामदेवांनी केले आणि म्हणूनच ते वारकरी संप्रदायाचे आद्य प्रचारक होत! आपल्या आत्यंतिक भक्तिभावाने त्यांनी साऱ्या महाराष्ट्राला वेडच लावले. नामसंकीर्तनाच्या तंद्रीत देहभान हरपून चंद्रभागेच्या वाळवंटावर नामा नाचत असे आणि त्याच्या अभंगवाणीचे पडसाद शूद्रातिशूद्रांच्या अंतःकरणातही उमटू लागत. त्यांची भक्तपरंपरा समाजाच्या सर्व थरांतून निर्माण झाली. सावता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा यांच्या शेकडो अभंगांच्या रूपाने ते जणू मनोमन एकाच कल्पनेने भारून गेलेला सुखसंवाद करतात.

परमात्मा एकच आहे आणि तो नामरूपातीत आहे ही मनोमय श्रद्धा असल्याने वारकरी संप्रदायाने इतर अनुषंगिक गोष्टींचे अवडंबर कधीच माजविले नाही. इतर संप्रदायांप्रमाणे त्यांनी आपला सवतासुभा स्थापला नाही किंवा पंथप्रमुखांचा वेगळा वर्गही बनविला नाही. त्यामुळे सर्वसामान्यांशी समरस होऊ शकणारा असा हा संप्रदाय यशस्वी झाला. एकनाथ गुरुपरंपरेने दत्तपंथीय असले तरी त्यांचा वंशपरंपरागत वारसा वारकरी संप्रदायाचा होता. नामदेवांनंतर स्थगित झालेल्या वारकरी पंथाच्या कार्यास त्यांनी पुन्हा गती दिली. तुकारामांनी हेच कार्य त्यानंतर अधिक उत्कटतेने पुढे चालू ठेवले. त्यांनी आपल्या अभंगांतून समाजकंटकांची यथोचित

संभावना करून चिरन्तन नीतिमूल्यांची जोपासना केली. ज्ञानेश्वरप्रणीत भागवत धर्माच्या देवालयावर कळस असे श्रेय तुकारामांना म्हणूनच दिले जाते.

थोडक्यात, वारकरी संतांनी बहुजन समाजाला अपरिचित अशा अंतर्जीवनाचा साक्षात्कार घडविला. आजवर कोंदलेल्या त्यांच्या जीवनाला एक नवी आशा, नवा विचार मिळाला. आयुष्याचे सार्थक करण्याचे साधन त्यांनाही सापडले.

**प्रा. कुलकर्णी :** म्हणजेच महाराष्ट्राची अस्मिता, कर्तव्यबुद्धी जागृत करून धर्म समाजप्रवण बनविण्याचे वारकरी संतांचे कार्य अत्यंत चैतन्यदायी व प्रवृत्तिपर होते असेच म्हटले पाहिजे. कारण कर्मनिष्ठा जागृत करून सामाजिक विवेकबुद्धी शाबूत ठेवणे ही काही साधी गोष्ट नव्हे. ज्ञानेश्वर–नामदेव–एकनाथ–तुकाराम हे या दृष्टीने अत्यंत व्यापक अर्थाने समाजाचे उद्धारकर्ते होते, असेच म्हटले पाहिजे. याच दृष्टिकोणातून दत्तसांप्रदायाचेही कार्य तितकेच महत्त्वाचे आहे. श्री. विलास कुलकर्णी त्याचे दिग्दर्शन करतील.

**विलास कुलकर्णी :** दत्तसंप्रदायाचा विचार करताना अपरिहार्यपणे लक्षात घ्यावी लागते ती समाजपरिस्थिती. काळानुसार धर्मसंप्रदाय निर्माण होत असतात. मुसलमानी आक्रमणानंतरच्या अस्मानी सुलतानी संकटकाळात हा संप्रदाय उदयास आला हे लक्षात घेण्यासारखे आहे. शैव, वैष्णव, शाक्त या तीनही प्रमुख उपासना एकत्रित करणाऱ्या दत्तात्रेयाचा प्रभाव गेली हजार-बाराशे वर्षे तरी आहे. महाराष्ट्रातील दत्तसंप्रदायाचा प्रसार हा ज्ञाती, संप्रदाय किंबहुना धर्माच्याही अतीत असल्यामुळे महत्त्वाचा आहे. महानुभाव, वाम, वारकरी, समर्थ या चारही संप्रदायांत दत्तात्रेया-विषयी उत्कट श्रद्धाभाव तर आहेच. शिवाय खास दत्तभक्तीची परंपरा चालविणारा दत्तसंप्रदायही आहे. यांत हिंदूबरोबरोबर मुसलमान उपासकांचाही समावेश होता. दत्तसंप्रदायांचे महत्त्व धर्मरक्षण व विकास या दोन्हींसाठी आहे.

१३ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत दत्तोपासनेचा जो पुराणप्रवाह वाहत आला होता, त्याचे पुनरुज्जीवन श्रीनृसिंहसरस्वतींनी केले. त्यांचे जीवितकार्य केवळ दत्तोपास-नेच्या क्षेत्रातच नव्हे तर समग्र महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात मार्गदर्शक ठरले. त्या काळात एका आक्रमणशील मुसलमानी संस्कृतीने हिंदू परंपरेचा ग्रास घेण्या-साठी महाराष्ट्रात सर्वत्र संचार चालविला होता. त्या संकटातून मुक्त होणाऱ्या दिशेने महाराष्ट्राला प्रयत्नोमुख करण्याचे कार्य त्यांनी केले. श्रीनृसिंहसरस्वतींनी संप्रदायाची स्थापना सोळाव्या शतकात केली. वर्णाश्रमोचित आचारधर्माचे काटे-कोर पालन करणे हीच त्यांची मूळ श्रद्धा. समन्वय व साधना यांचे सूत्र त्यांनी गुंफले. दत्तसंप्रदाय व मराठी भक्तिपरंप्ररा यांत सगुणोपासना व गुरुभक्ती हे समानविशेष असले तरी दत्ताच्या सगुण साक्षात्कारासाठी दत्तोपासक योगासारखी अत्यंत कठोर अनुष्ठाने करतात. ध्यानासाठी दत्ताचे सगुण रूप स्वीकारलेले असले तरी औदुंबरवाडी, गाणगापूर या ठिकाणी पूजोपचारासाठी, मूर्तिऐवजी पादुकाच

प्रशस्त मानल्या गेल्या. अर्थात् मूर्तिमंदिरांचा विध्वंस करणाऱ्या यवनांच्या अत्याचारापासून आपल्या श्रद्धास्थानांना सुरक्षित ठेवण्यासाठी आणि त्यांच्या उपास्य-प्रतीकांशी काहीसे साम्य दाखविण्यासाठी हेतुपूर्वक पादुकांची उपासना रूढ केली गेली.

या बरोबरच दत्तभजनांत संगीताला त्यांनी दिलेले प्राधान्यही मुसलमान सूफींची उसनवारी वाटते. धुपाचा वापरही मुस्लीम वातावरणाचे अनुकरण ठरते. याशिवाय दत्ताने मलंगाच्या वेषात दर्शन देणे यातही हा परिणाम जाणवतोच. दत्तसंप्रदायाने समन्वयाच्या सूत्राबरोबरच वैदिक संस्कृतीचे स्थलकालानुसार पुनरुज्जीवन करून चातुर्वर्ण्य पद्धती स्वीकारली. दत्तसंप्रदायाच्या या समन्वयी धोरणामुळे महाराष्ट्रातील इतर पंथांवर याची मोठी छाप पडली. दत्तसंप्रदायाचा असा सर्व दृष्टींनी विचार केल्यावर प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे धर्मरक्षण आणि धर्मविकास हे हेतू थोडया प्रमाणांत का होईना पण सिद्धीस गेलेले दिसतात.

**प्रा. कुलकर्णी :** दत्तसंप्रदायाने अस्मानी सुलतानी संकटाच्या काळात वारकरी पंथाबरोबर धर्मरक्षणाचे जसे महत्त्वाचे कार्य केले, तसेच स्वराज्यस्थापनेच्या काळात समर्थांच्या कार्याचे तेज प्रकर्षाने दिसून आले. या कु. मीरा पारिपत्यदार समर्थ संप्रदायाचे थोडक्यात विवेचन करतील.

**मीरा :** वैदिक वर्णाश्रमधर्माचे पुनरुज्जीवन, रामोपासनेच्या अधिष्ठानावर करणारा संप्रदाय रामदास स्वामींनी सुरू केला. या संप्रदायास रामदासी, समर्थ किंवा दास संप्रदाय असे म्हणतात. यांचे आराध्यदैवत राम आहे, तर हनुमंत या शक्तिशाली देवतेची उपासना या संप्रदायात सुरू करून रामदासांनी शक्तीच्या उपासनेची परंपरा निर्माण केली. रामदासांचा राम कोदंडधारी म्हणजे दुष्टांचे निर्दालन करणारा आहे. धर्मरक्षणासाठी स्वराज्यस्थापनेची आवश्यकता आहे हे ओळखून त्यासाठी समर्थांनी ठिकठिकाणी मठ स्थापले, त्यांवर महंतांची नेमणूक केली आणि मुख्य म्हणजे मोठ्या प्रमाणावर संघटना केली. रामदासांनी आचारधर्माचे निरनिराळे निर्बंध निर्माण केले होते. उदा. ब्रह्मचर्यव्रत पाळणे, भगवी वस्त्रे परिधान करणे, दासबोधाची नित्य पारायणे करणे, मनाचे श्लोक म्हणत भिक्षा मागून त्यावरच निर्वाह करणे. या सर्वांतून हेच दिसते की, रामदासांनी फक्त आध्यात्मिक दृष्टीच समोर ठेवली नाही तर तिला प्रपंचाची जोड देऊन अध्यात्म हे व्यवहाराच्या सर्वांगांना व्यापून उरते हे प्रत्यक्ष स्वतःच्या कृतीतून दाखवून दिले. अशा तऱ्हेने महाराष्ट्राच्या संस्कृतीचे व्यावहारिकदृष्टया अत्युच्च टोक या संप्रदायाने गाठले.

पण इतर संप्रदायांप्रमाणे हा संप्रदायही वैदिक आहे. औपनिषदीय तत्त्वज्ञानाचा परिणाम यावर आहे. भक्ती व नामस्मरण यांना इतके महत्त्व याही संप्रदायाने दिले की, रामदासी संप्रदायाचा प्रमुख ग्रंथ जो दासबोध, त्यात या दोन्हींवर अत्यंत मार्मिक निरूपण रामदासांनी केले आहे. शिवाय परंपरागत अद्वैत तत्त्वज्ञान अगदी सोप्या मराठीत यात मांडलेले दिसते. चौदा विद्या, चौसष्ट कला यांहून सर्वांत श्रेष्ठ

असे मोक्षदायी आत्मज्ञान त्यांनी विशेषत्वाने सांगितले आहे. रामदासही परब्रह्म हे निर्गुण, निराकार, शाश्वत, केवळ ज्ञानस्वरूप आहे, असेच सांगतात. ब्रह्माच्या ठायी देहबुद्धीचा मोठेपणा चालत नाही. सर्वांठायी एकच ब्रह्म आहे, सर्व प्राणिमात्र समान आहेत, इत्यादी तत्त्वांचा अवलंब करून वागणे हे प्रत्येक सांप्रदायिकाचे कर्तव्य ठरते. याखेरीज प्रत्येक महंताने अतिशय निरपेक्ष रीतीने वागले पाहिजे, असा रामदासांचा दंडक होता. ब्राह्मण्याचे रक्षण आणि विवेकवैराग्याची वृद्धी यांवर रामदासांचा कटाक्ष होता. समाजसेवा, परोपकार, त्यागी वृत्ती यांच्या पालनाचा ते उपदेश करतात आणि त्यासाठी निस्पृहतेचा, भिक्षाटनाचा मार्ग सुचवितात. 'आधी करावे ते कर्म। कर्म मार्गे उपासना। उपासका सापडे ज्ञान। ज्ञाने मोक्षचि पावो' किंवा 'उपासना कर्म हे आधी पाळावे। मग सांभाळावे ब्रह्मज्ञान॥' इत्यादी बोधपर वचनांवरून समर्थांचा वर्णाश्रमधर्म विहीतकर्म आचरणावर असलेला भर स्पष्ट होतो.

परंतु समर्थांचे कार्य इतर संतांहून वेगळे आहे ते कोणत्या अर्थाने आहे ते पाहिले पाहिजे. समर्थांनी प्रत्यक्ष कृती करून आपल्या दासबोधांतून महाराष्ट्रीय समाजाला प्रपंचविज्ञानाचे बाळकडू पाजले. त्यांचे कार्य प्रामुख्याने धार्मिक स्वरूपाचे आहे यात शंका नाही. पण त्यांचा भक्तिमार्ग म्हणजेच व्यवहार धर्म. कर्मयोगी निर्माण करणे हेच त्यांचे ध्येय. 'जन हेची जनार्दन' हे तत्त्व व्यापकतेने आचरणात आणण्याचा ते उपदेश करतात. राजकीय स्वातंत्र्यशिवाय धार्मिक स्वातंत्र्य टिकत नाही हा त्यांचा पक्का विचार. म्हणूनच पराक्रम, शौर्य, एकता यांवर त्यांनी भर दिला. मठ, महंत, शिष्य वर्गाला एकात्मतेची दीक्षा दिली. सहिष्णुऐवजी जयिष्णुधर्म शिकवला आणि स्वामिद्रोह्यांना स्वामिनिष्ठ बनविले. रामदासांना समाजकारणी संत असे सार्थतेने म्हणता येते. त्यांची दृष्टी सदैव समाजमनात गुंतलेली होती. समाजाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी अव्याहत कष्ट केले.

**प्रा. कुलकर्णी :** या सर्व विवेचनाचा इत्यर्थ असा की, महाराष्ट्रधर्म, मराठ्यांची अस्मिता इत्यादी शब्दप्रयोगांनी जी महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख करून दिली जाते ती प्रमुख्याने महाराष्ट्रातील धार्मिक पंथोपपंथांच्या शिकवणुकीतून, कार्यातून उदित झाली आहे. निव्वळ शारीरिक भावनने जगणाऱ्या, केवळ प्रवृत्तिपर निष्ठेपेक्षा ही आध्यात्मिक निष्ठा अधिक कर्मपर व मनाचे उन्नयन करणारी आहे.

मानवी सुखाचे मूळ कारण मानवी मन हे असून त्याच्या अत्युच्च सुखाचा मार्ग सामाजिक कर्तव्यबुद्धीतून वाढतो हेच या धर्मपंथांनी सांगितले. अशा प्रकारच्या त्यांच्या सामाजिक विवेकबुद्धीच्या जाणिवेनेच महाराष्ट्रात स्वराज्यस्थापनेला अनुकूल भूमी तयार झाली. समर्थ व शिवाजी हे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम व नृसिह सरस्वतींच्याच कार्याचा परिपाक होत. ज्ञानेश्वर व रामदासांच्या तत्त्वज्ञानात जसा फरक नाही तसाच त्यांच्या सामाजिक जाणिवेत व कार्यांतही नाही. ○

[पुणे आकाशवाणीच्या सौजन्याने]






आज सकाळी रेडिओ आरवण्याच्या आधी स्टोव्हचा आवाज लग्नानंतरच्या आयुष्यात प्रथम कानांवर पडला व मनाला भूकंपाइतकाच जोरदार धक्का बसला म्हणाना.

साखरझोपेचे सावट फेकून देणे जिवावर आले होते, पण त्याप्रमाणेच पांघरूण उचलून समोर कोणते दृश्य असेल हे पाहण्याचा मोह मात्र अजिबात टाळता आला नाही. डोळे किलकिले करून प्रथम पाहत असता, हळूहळू ते विस्फारत गेल्याची जाणीव तब्बल पाच मिनिटांनंतर मला झाली.

अनू म्हणजे आमची धर्मपत्नी, चहाच्या डब्यावर ताल धरून कुठलेतरी एक फिल्मी गाणे गुणगुणत होती, चहाचे आधणही हळूहळू उकळत तिला साथ देत होते--

एरव्ही ६ ते ७ पर्यंत सकाळी, पुणे–मुंबई केंद्रांची भक्तिमार्गपथपर गाणी झाली की हळूहळू घर ऐहिक स्थितीवर यावयाचे, मग स्टोव्हचा आवाज, मग कपबशांचे नर्तन; मग चहाचे दर्शन.

अर्थात् हा कपिलाषष्ठीचा योग का आलाय ह्याचे कारणही सयुक्तिकच होते. बरोबर दोन महिन्यांनंतर, आमच्या कुटुंबावर ओढवलेल्या आणीबाणीच्या परिस्थितीचा आज अंत होणार होता.

दोन महिन्यांनंतर अनूचे गुणगुणणे – अर्थातच खुषीतले – आज माझ्या कानांवर पडत होते.

---

**प्रमोद प्रभाकर मोघे**

---

सांगलीहून माझी पुण्याला बदली झाली व आमच्या संसारात रोज वावटळ उठू लागली. कधी कधी इतकी जोरदार की ह्याचा शेवट कुठल्या थराला जातोय, असे वाटायचे.

तसे म्हणाल तर सांगलीचे जीवन आमच्या पचनी चांगलेच पडले होते.

सांगली गाव तसे पुण्यापेक्षा लहान ! पण तेथेसुद्धा नव्या युगाची पहाट झालीय ना ! जागा मिळणे तेथेही दुरापास्त होत चाललीय.

परंतु थोडे जास्त भाडे, सरकारी ती पण बदलीची अशी नोकरी, आटोपशीर कुटुंब, इतके गुण तुमच्या पत्रिकेत असले तर सांगलीला तुमची पत्रिका जुळली म्हणूनच समजा.

माझी पण पत्रिका तेथे छान जुळली होती. चांगला तीन खोल्यांचा ब्लॉक मला ओव्हरसियर कॉलनीत मिळाला होता. नोकर–चाकरसुद्धा सुदैवाने चांगले लाभले होते. शहर लहान असल्याने महागाईची झळ पण कमी होती सांगलीला.

सगळे कसे मुबलक ! मी, अनू, आमचे युवराज मिलोबा, सांगलीवर बेहद्द खूष होतो.

आयुष्यात आजकाल चांगला शेजार, हासुद्धा दैवाचा भाग. पण ती कर्मकठीण गोष्टसुद्धा सुलभतेने मला तेथे लाभली होती.

सगळीकडे कसा आनंदीआनंद वाटत होता—पण आनंद हाच जीवनाचा स्थायी-भाव असता तर त्याला जीवन कोण म्हणेल ?

चांगल्या चित्रपटाची रिळे आलटून पालटून गेल्याने त्यांतील सुसंगती नष्ट व्हावी, अगदी तशी गत माझी बदली पुण्याला झाल्यामुळे झाली होती.

खरे सांगायचे म्हणजे 'पुणे' एवढे कुणी पूर्वी उच्चारावयाचा अवकाश, लहान-पणापासून ते अगदी कालपरवापर्यंत ऊर कसा भरून यावयाचा.

जन्मापासून तो अकरा वर्षांचा स्वप्नाळू काळ स्मृतिरूपाने जागा व्हावयाचा.

हलवा करताना जसे तिळावर हळूहळू काटे फुलतात अगदी तस्से माझे व्हाव-याचे. स्मृतिरूपी काटे पुण्याच्या नावावर हळूहळू फुलावयाचे, पुण्याचे नाव निघताच.

वडिलांनी नोकरीनिमित्ताने पुणे सोडले वीस वर्षांपूर्वी. नंतर आमच्यापकी कोणीच पुण्याला स्थायिक होऊ शकले नाही.

सध्याचे पुणे व मी पाहिलेले पुणे ह्यात इतके महद् अंतर होते की थोडीफार माझी अवस्था रिप् व्हॅन व्हिकलसारखीच झाली म्हणाना; तो म्हणे वीस वर्षांनी निद्रेतून जागा झाला आणि मी वीस वर्षांनंतर जन्मग्रामाचे दर्शन घेत होतो.

माझ्यावेळचे पुणे मनाच्या म्युझियममध्येच ठेवण्याच्या लायकीचे झाले होते.

काय हवेत तरंगलो होतो मी पुण्याला बदली झाली म्हणून. अनूलासुद्धा सांगली सोडताना अजिबात वाईट वाटले नव्हते.

मला वाटले होते, माझ्यासारख्या उच्चदर्जीय सरकारी अधिकाऱ्याला, थोडे

पैसे जास्त देतो, म्हटले तर डेक्कनसारख्या गजबजलेल्या ठिकाणी सहज दोन-तीन खोल्या मिळतील.

पण डेक्कनवरची जागा मिळवणे, ही सद्यःस्थितीत पूर्वजन्मीच्या पुण्याईची बाब आहे अशी अंधुकशीदेखील कल्पना मनाला शिवली नव्हती सांगलीहून येताना.

जेथे जेथे प्रयत्न केले तेथे एक 'जागा सोडून काहीही सांगा' हाच कालवा ऐकावयास मिळाला.

मला सांगली व येथील असे दोन संसार चालवणे, एकदम अशक्य होते.

अखेर मी माझ्या मित्राच्या ओळखीने एका मंगलकार्यालयात 'ऑफ्सीझन्-' मध्ये राहण्याच्या अटींवर कशीबशी एक खोली मिळवली.

बोलून चालून मंगलकार्यालयाची कोठीची खोली ती, तिच्यात सोयी कोठून असणार !

तेथे संसार वसवला व त्या दिवसापासून मी संसारसुखाला पार आंचवलो.

अनूला अशा चार भिंती, म्हणून मानलेली खोली, अशा जागेत राहण्याची कधीच सवय नव्हती. बेळगाव माहेर तिचे. दुर्बिण घेऊन रस्त्यावर उभे राहिले तर पलीकडचे दार दिसते; इतक्या मोठ्या घरात राहण्याची, वावरण्याची सवय आणि मीसुद्धा इतक्या संकुचित क्षेत्रात प्रथमच वावरत होतो; ऐसपैस राहण्याची सवय आम्हांला आता नडत होती म्हणाना.

पाण्यापासून, दळणापर्यंतची सर्व कामे आता माझ्यावर पडू लागली होती; ह्या कुठल्याच गोष्टींची सवय नसलेल्या आम्हा दोघांमध्ये चिडाचिडीचे वातावरण निर्माण होऊ लागले, संसाररथाची दोन्ही चाके गाडा ओढीत होती, एवढेच्–पण कुरकुरतच.

अनू संसारात रस घेऊन रमणारी स्त्री, त्यातून कलासक्त. सांगलीला असताना काय सुरेख घर ठेवले होते तिने. घरात पाऊल ठेवले की येणारा अगदी मंत्रमुग्ध व्हावयाचा. टापटीप, मांडणी, जुळणी, सगळे व्यवस्थित. तिच्या रसिकतेला लोकांची अमाप दाद मिळे.

पण येथे एका खोलीत तिचे व्यक्तिमत्त्व पार झाकाळून गेले; एका खोलीत स्वतःचे असे कोणते वैशिष्ट्य दाखवणार ती ?

व्हावयाचा तो परिणाम झाला. अनू मनातून कुढू लागली. दोन महिन्यांत ती पार बदलून गेली, इतकी की संसारातील काव्य संपुष्टात आले की काय इतपत वाटावयाला लागले मला.

अजून दोन वर्षे मी पुण्यातून हलतो, असे स्वखुषीने मी म्हटले असते, तरी कुणी बदली करण्यास तयार झाले नसते. जागेपायी आपल्याच हातांनी मी जणू काही संसारसुखावर निखारे ठेवतोय की काय असेच मला ह्या दोन महिन्यांत वाटू लागले.

पण काल, ऑफिसमधोल देशपांडेने माझ्यात परत उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

देशपांडे, माझ्या हाताखालचा एक कारकून, पण घरचा गडगंज, सर्व बाजूंनी पैसा धावून यावयाचा, इतकी पुण्याई पिताजींमुळे त्याने गाठीला बांधली होती.

ही नोकरी निव्वळ तो वेळ घालवण्याकरता करीत होता ह्यात वादच नव्हता. इतका सुखी कारकून आयुष्यात प्रथमच मी पाहत होतो.

" काय साहेब, जागेचं जमलेलं दिसतंय. हल्ली जागा हा विषय तुमच्या बोलण्यात नसतो म्हणून विचारतोय हं. " इती देशपांडे.

रोजच्यापेक्षा मी घरी जरा जादा वैतागलो होतो, पण ह्या देशपांडेवर खवळून काय उपयोग, म्हणून हसत कुत्सितपणे मी म्हणालो–

' देशपांडे, जागा ज्या दिवशी मिळेल ना, त्या दिवशी तुम्हांला ऑफिससमोर, पेशवे पार्कमधील हत्ती दिसेल. सर्व स्टाफला मी साखर वाटणार आहे त्याच्यावरून– समजलं ?'

' पाहा हं श्रीखंडेसाहेब, पस्तावाल. ' देशपांडेच्या स्वरांत मिस्किलपणाची झाक होती.

मी तुच्छतेने उदगारलो, ' हं, मिळवून तरी द्या अगोदर. मग तुमची वरातसुद्धा त्यावरून परत एकदा काढावयास माझी तयारी आहे, त्या बदल्यात. '

दोन महिन्यांतील अनुभवलेल्या निराशेची चीड माझ्या शब्दाशब्दांतून व्यक्त होत होती.

यावर देशपांडे म्हणाला, ' श्रीखंडेसाहेब, आज मला चहा पाहिजे तुमच्याकडून आणि कारणही त्याला सबळ असंच आहे. '

' साहेबांकडून चहा मिळवावयाचा, म्हणजे काय साधे कारकुनी कारण चालणार आहे होय ?'

सरळ त्याला घेऊन ऑफिसच्या कॅन्टीनमध्ये गलो. स्वारी सिगरेटची धूम्रवलये अवकाशात सोडत म्हणाली,

' श्रीखंडेसाहेब, माझ्याच मालकीचे घर येथे सदाशिवात आहे. माझा जुना भाडेकरू ५–६ महिन्यांपूर्वीच सोडून गेलाय तेथील जागा. मला भाडेकरूची कटकट नको होती म्हणून ती जागा मी अडगळीची केलेली आहे.

तुमची त्रेधा तिरपीट पाहतो आहे मी गेला महिनाभर. पण तुमच्या स्वभावाचा अंदाज लावावयास मला इतका वेळ लागला. आता वाटतंय ठीक आहे, जागा तुम्हांला द्यावयास काहीच हरकत नाही. कारण तुमची बदली १॥–२ वर्षांत होणारच. त्यामुळे कायमचा ताबा राहणार नाही तुमचा. दुसरी गोष्ट कुटुंब आटोपशीर आहे. आमच्या सौ. व आईला प्रशस्त, एसपैस कुटुंब अजिबात आवडत नाही.

फक्त एकच गोष्ट एक करार करावा लागेल आपल्याला. तो म्हणजे तुमच्या पश्चात् तुम्ही ही जागा अडवणार नाही, हीच एक गोष्ट. '

एवढे लांबलचक बोलणे त्याने सिगरेट टाचेखाली विझवून संपवले.

सहजासहजी कोणतीही गोष्ट, अर्थात्च अवघड, झाली म्हणजे प्रथम विश्वासच बसणे कठीण होऊन जाते.

दोन महिन्यांनी प्रथम 'जागा आहे' हे शब्द कानी पडत होते, अक्षरशः अमृत-वाणीच माझ्या कानांवर पडल्यासारखे मला वाटत होते.

मला बोलणेच सुचत नव्हते. देशपांडेने सत्त्वपरीक्षाच घेतली होती एकप्रकारची. पण एवढा 'वर' दिला होता खूष होऊन, हे काय कमी होते ?

देशपांडेने मला लगेच जागा पाहण्याचे आमंत्रण दिले होते.

"हो म्हणजे घरच्या मंडळींचीही ओळख होईल तुमची त्या निमित्ताने. उद्याच या. रविवार आहे, सकाळीच या चहाला.–"

ऑफिस कधी सुटतंय व वरील बातमी मी अनूच्या कानांवर कधी घालतोय असे मला झाले होते.

बातमी कानांवर पडली मात्र तिच्या, चेहऱ्यावरची वैतागाची जागा उत्साहाने ओसंडू लागली आणि अशी रंगात आली की मला लग्न होऊन नुकताच महिना झालाय असे वाटावे. मिलोबालासुद्धा दोन महिन्यांनंतर, मातृसुख ही चीज उमजली असावी.

अनूने आज सकाळी एवढ्या भल्या पहाटे उठून, रेडिओवरची भजने इत्यादी ऐकावयाचे विसरून स्टोव्हकडे प्रथम धाव घेतली गेली ह्याचे कारण आता सांगावयास पाहिजे होते का ?

आम्हांला ठीक ९ वाजता देशपांडेकडे जावयाचे होते. मीसुद्धा आळस, बिळस झटकून 'बहुत दिन नच' इत्यादी गाणी घोळवत सगळे व्यवस्थित आटोपून तयार झालो. आश्चर्याची गोष्ट येथे एवढीच की, अनूचे आज माझ्या आधी सगळे आवरले होते.

बायकोने वेळेच्या आधी तयार असणे ही गोष्ट अशक्य कोटीतील, पण आज, आज तीसुद्धा सहज जमून गेली होती.

कारण एकच, ओढ होती वास्तूची.

देशपांडेचे घर शोधणे अजिबात जड गेले नाही आम्हांला.

वास्तू जुनी होती, पण तिचे वृद्धत्व झाकण्याचा प्रयत्न रंगरंगोटी, डागडुजी करून करण्यात आला होता.

अनू तर प्रथमदर्शनाने अतिशय खट्टू झाली पण लगेच तिला बहुधा ते मंगल कार्यालय कोठीदर्शन झाले असावे. स्वतःला सहजगत्या सावरत ती स्मित करून मला म्हणाली 'छान आहे हं, जागा !'

'देशपांडे स्वतः पुढे आला. घराची आतील रचना उत्तम होती. मला थोडेफार कौतुक वाटले-वाटले देशपांडेच्या वडिलांना भलतीच दूरदृष्टी असावी. नव्या-जुन्याची सांगड अगदी व्यवस्थित बसली होती घरात.

वाडा दुमजली होता व केवढा मोठा !

साफसफाई करून ठेवलेल्या वाड्याच्या पश्चिमेला असलेल्या त्या स्वतंत्र खोल्या पाहून आम्हा उभयतांचा आनंद गगनात मावेना. अनूच्या चेहऱ्यावर पसंतीचे शिक्का-मोर्तब उठलेले दिसले—मनात म्हटले, सुटलो.

देशपांडेने प्रथम त्याच्या बायकोची ओळख करून दिली.—मामला व्यवस्थित जमला होता. तेवढ्यात देशपांडे म्हणाला, 'अजून आई देवपूजेत आहे, ती संपल्या-वर तिची पण ओळख करून देतो. तोपर्यंत चहा घ्या तुम्ही.'

चहा, पोहे दुहेरी थाट समोर आला, एवढ्यातच त्याची आई तेथे आलीच. कपाळावरून देशपांडेचे तीर्थरूप हयात नाहीत हे समजून आले.—बाईंचे वय साठीच्या पुढे असून काठी ताठ होती. बोलण्याची सुरुवात करून अनूला अथपासून इतीपर्यंतचे सगळे कौटुंबिक प्रश्न विचारलेन्.

आणि मध्येच स्मरल्यासारखे करून ती मला विचारती झाली, 'अहो, तुम्ही श्रीखंडे ना ? येथे पुण्याला श्रीधरपंत श्रीखंडे म्हणून मामलेदार राहावयाचे पाहा. फार पूर्वीची गोष्ट आहे —'

माझ्या वडिलांचे नाव म्हातारीच्या तोंडातून बाहेर पडल्यावर मी एकदम खुषीने उदगारलो, "अहो, ते तर माझे वडील. आम्ही तुळशीबागेच्या आसपासच राहत होतो वीस वर्षांपूर्वी."

'म्हणजे हरीतात्या तुमचे आजोबा तर. प्रख्यात वकील होते ते पुण्यात त्या वेळी. —'

'हो, माझे आजोबाच ते. आमची बदली चांद्याला झाली, त्याच वेळी ते वारले —' मी.

मला वाटले झाले काम, अगदी सोळा आणे फत्ते, एवढी घरची ओळख निघा-ल्यावर मग काय हो —

पण समोर उलटाच प्रकार दिसावयास लागला मला. देशपांडेच्या आईच्या डोळ्यांत अश्रूंची माऊगर्दी झालेली दिसली आम्हांला—

'तात्या, — (म्हणजे आमचा देशपांडे) तू जरा आत चल रे —'

मी व अनू अवाक् होऊन चहाच्या वाफेकडे पाहतच राहिलो—

आतील खोलीतून तारस्वरांत आमचा देशपांडे व घोगऱ्या स्वरांत त्याची आई ह्यांचे संमिश्र आवाज आमच्या कानांवर पडत होते.

कोर्टामध्ये निकालाच्या क्षणी जशी शांतता असते, अगदी तशी माझ्यात, अनूत, देशपांडेच्या बायकोत पसरली होती.

देशपांडे मान खाली घालूनच बाहेर आला, माझ्याजवळ येऊन जवळजवळ रुद्ध स्वरांत मला तो म्हणाला, 'माफ करा श्रीखंडे, ही जागा आपल्याला मी देऊ शकत नाही.'

हा हा म्हणजे माझ्या व अनूच्या सहनशीलतेचा अक्षरश: अंत होता.

मी देशपांडेचे खांदे गद्गद् हलवीत म्हटले, 'पण का? काही कारण तरी सांगाल ?' मी एकेरीवर जात चाललो.

'मी सांगते'– माझ्यामागून आवाज आला. गंभीर पण हेलावून सोडणारा.

देशपांडेची आई सदरेवर उभी होती. डोळ्यांतून अश्रू निपटतच ती पुढ आली, नाकपुड्या व कानाच्या पाळ्या लाल झाल्या होत्या.

श्रीखंडे, तुमची एखादी वास्तू ह्या पुण्यात होती, असं कधी तुमच्या तीर्थरूपांनी तुम्हांला सांगितलंय ?' मी नकारार्थी मान हलवली.

'माझ्या वडिलांनी कधी घराची अथवा घर बांधावयाची अशी इच्छाच उभ्या आयुष्यात दाखवली नाही'–मी म्हणालो–

'चांगलंच केलं त्यांनी'–देशपांडेची आई म्हणाली, 'का माहिती आहे?– ही तुमच्या जन्माअगोदरची कहाणी आहे, श्रीखंडे.

ज्या वास्तूत तुम्ही उभे आहात ती वास्तू आहे तुमचीच–म्हणजे तुमच्या पूर्वीच्या मालकीची. चाळीस वर्षांपूर्वी ही आमच्या ताब्यात आली–म्हणजे तुमच्या आजोबांनी विकली. कारण माहिती आहे ? ती त्यांना कधीच लाभली नाही. हजारो संकटे कोसळली ती बांधल्यापासून त्यांच्यावर. त्यांना बायकोचा तीन महिन्यांत कायमचा सहवास अंतरला. येथे आल्यापासून तुमचे दोन चुलते वर्षाच्या आतच गिळंकृत केलेत ह्या वास्तूने.

येथील वास्तव्यात त्यांनी हातांत घेतलेल्या सोन्याची माती होऊ लागली. निरुपायाने त्यांनी हौसेने बांधलेली ही वास्तू आपल्या पुरोहितालाच स्वस्तात विकली. आणि मजा अशी की मालकी बदलताच पुरोहिताला ती छान लाभली. त्या कुटुंबाचे भले झाले–

'श्रीखंडे अनेक आहेत, पण तात्याने आज सांगताच, प्रथमवास्तूचा वंशज आपल्या पायांनी येथे चालत येईल हीच अशक्य कोटीतील गोष्ट वाटत होती मला. पण ती गोष्ट घडली–वंशज परत वास्तूकडे खेचला गेला.

तात्याने सगळी माहिती दिलीय मला. तुमच्या सौख्याला सुरूंग लावायचा नाही आहे मला. तात्या दुसरीकडे तुम्हांला नक्कीच जागा मिळवून देईल बरं का !

सूनबाई, ह्यांचा चहा झाला की मला सांग बरं का–मी आतल्या खोलीत आहे.

बहुतेक भावनेला बांध घालणे आता तिला अशक्य झाले असावे; निदान आमच्यासमोर तरी.

कुंकू लावताना अनूला एक भारी खण व माझ्या हाती चांदीचे भांडे आले. नाही नाही म्हणत असता, त्या वृद्धेने आमच्या हातात बळेच कोंबले.

दाराच्या बाहेर पडताना आम्ही उंबरठ्याबाहेर एक क्षणभर उभे राहिलो.

क्षणभर माझ्या मनात वादळ उठले, एकेकाळचा परंपरेने मालक होणारा वंशज आज उंबरठ्याबाहेर हात जोडून उभा होता वास्तूला. ○

प्रखर देशभक्ती

सूत्रबद्ध संघटना

अमोघ वक्तृत्व

देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच

परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड

हे सर्व हिटलरपाशी होते


तरी अखेर

त्याचा पराभव का झाला ?

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये



# आत्मार्पण

**दिनांक २६ फेब्रुवारी हा वीर सावरकरांचा आत्मार्पण दिवस**

सौ. निर्मला वैद्य

२६ फेब्रुवारी येतो–तसाच २८ मेही येतो, नि मनात अनेक आठवणी फुलवून जातो. एरवी प्रसंगपरत्वे आठवणींना जाग येतेच, पण ह्या दिवशी त्या अधिक असतात एवढे मात्र खरे. त्यांतील काहींनी सुख होते तर काहींनी दुःख, तर काहींनी मन कमालीचे हळहळते.

मनात एकसारखी हळहळ होते ती तात्यांच्या शेवटल्या दिवसांतील काही स्मृतींनी. तात्यांचे ते शेवटचे दिवस व त्या काळातील त्यांचे ते वागणे! सारेच अपूर्व. तात्यांचा मृत्यू, हे एक दिव्य होते! कारण तो निमंत्रित होता! खरे म्हटले तर तात्यांचा शेवटचा आजार हा आजार नव्हताच, तर ती एक खडतर तपश्चर्या होती! एक दिव्य साधना होती! यासाठी लागणारे अफाट मनःसामर्थ्य फक्त तात्यांजवळच होते.

ती. स्व. माई स्वर्गवासी झाल्या त्या दिवशीचा हा प्रसंग आहे. माईंना विद्युत्-दाहिनीकडे नेल्यावर आम्ही काहीजणी सावरकर सदनात गेलो. भाग्य थोर ठरले नि १०–१५ मिनिटे का होईना पण तात्या भेटले. जन्माच्या जोडीदारीणीच्या मृत्यूने झालेली या थोर पुरुषाची प्रतिक्रिया पाहण्याची मला फार उत्सुकता होती.

'ये, ये, निर्मला, तू गेली होतीस तिकडे ?' तात्यांनी विचारले.

मी 'हो ऽ' म्हटले नि मला रडूच कोसळले. संयम जमला नाही.

'अग, असं रडू नाही–माई गेली–तिचं सोनं झालं. वास्तविक ती इथून रुग्णालयात गेली तेव्हाच जायची. पण आधुनिक उपचारांनी तुम्ही तिला १५–२० दिवस जास्त जगवलंत.'–थोडे थांबून तात्या परत बोलू लागले. 'तू तर इतकी वर्षं पाहतेच आहेस, घरात स्वयंपाकाला बाई, वरकामाला गडी नेहमी असतोच. माझ्यापरी मी तिला शक्यतो सुख दिलं!' पुन्हा थोडी शांतता! 'माईचे शारीरिक हाल फारसे झाले नाहीत. तिचे खरे हाल झाले ते मानसिक!" माईंच्या जीवनातील हे सत्य! त्याची त्या दिवशी तात्यांनी दिलेली ही जाणीव म्हणजे माईंना कृतज्ञतेने वाहिलेली सार्थ अशी श्रद्धांजलीच वाटली मला.

'तात्या ! माई गेल्या म्हणजे आपलं हक्काचं माणूस गेलं असं समजून तुम्ही संकोचून वागू नका हं ! काय हवं, नको, ते मोकळेपणी सुंदरला (तात्यांची सून), आम्हांला सांगा. हाल करून घेऊ नका.' मी कसेबसे एवढेच म्हटले.

'छे, छे, मला संकोचायचं काय कारण आहे ? मला हवं ते मी मागू शकतो, घेऊ शकतो. सुंदरदेखील सगळं चांगलं करते.' तात्यांनी सांगितले. मला पुन्हा हुंदका आलाच.

'अग ऽ ! इतकी शहाणी मुलगी तू ! दुःख आवरलं पाहिजे आता. मला खूप खूप बोलावंसं वाटतं...पण...' तात्या परत थोडे थांबले नि बोलू लागले. "माई गेली ! आता मी माझ्या कर्तव्यातून खरा मुक्त झालो !" हे शब्द बोलताना तात्यांच्या आवाजाला व शब्दांना एक वेगळेच रूप आले होते. 'Duty done ! Now I won't survive for a long time ! Now it is a question of few months only." कधीही नव्हे, फारच क्वचित वेळी इंग्रजीतून बोलणारे तात्या वरील वाक्य अशा काही ठाशीव आविर्भावात बोलून गेले की ते मनावर कायमचेच कोरले गेले.

फार फार दिवसांपूर्वी, आजार, मृत्यू या विषयांवर गप्पा चालल्या असताना रामदासांनी अखेर अन्नत्याग कसा केला, ते कसे वारले, हे त्यांनी मला सांगितले होते.

तात्यांनी उच्चारलेले ते इंग्रजी वाक्य माझ्या मनात सारखे घोळत राहिले होते नि Question of few months चा उलगडाही झाल्यासारखे मला वाटू लागते. वरील वाक्याला वजन होते, ते भीष्मप्रतिज्ञेसारखे कणखर होते, ते मी समजून गेले नि म्हणूनच सुंदर, विदुला (तात्यांची नात), तात्यांची नर्स ह्या कोणी भेटल्या की मी तात्या काय जेवतात, किती खातात याची न चुकता विचारपूस करीत असे. अखेर एकदा श्री. धनंजय कीर भेटले नि म्हणाले, "आत्महत्या की आत्मार्पण ? ह्या विषयावर उद्या माझ्याशी बोलणार आहेत तात्या." मी हे ऐकले मात्र नि मनात जे काय समजायचे ते समजून गले. परंतु प्रत्यक्षात तात्यांनाच हे विचारायचे धाडस मात्र फार उशिरा झाले.

दुःखाचे म्हणावे की सुखाचे म्हणावे ते कळत नाही. परंतु या माणसाचे हे आत्मार्पणाचे नियोजन (Planning) मात्र अगदी कौतुकास्पद, पद्धतशीर होते !

आहार हळूहळू पण अगदी निश्चितपणे कमी कमी करणे चालले होते. सर्व मनःसामर्थ्य जणू या आत्मार्पणासाठीच पणाला लावले होते. पाच-सहा महिने झाले, आठ-दहा, नव्हे वर्ष संपले. परंतु तात्यांची नि नियतीची इच्छा काही जुळेना. सदैव भयाने दूर राहिलेल्या मृत्यूला तात्यांना जवळ घेण्याचे धाडस अजूनही होत नव्हते. तात्यांची याचना का कुणास ठाऊक पण तो ऐकत नव्हता. तात्यांना सदैव संकटमुक्त करणाऱ्या नियतीला तात्यांना संकट वाटणारे त्यांचे जीवन संपवावेसे वाटत नव्हते. नियती नि तात्या यांचा जणू संघर्षच सुरू झाला होता. (नियती हा तात्यांचा

आवडता व मान्य असा शब्द) तात्या अगदी सर्वस्व पणाला लावून जिद्दीने मृत्यूला आळवीत होते. हे सारे आठवले की वाटते, या माणसाचे सारेच काही आगळे– अगदी जगावेगळे ! असामान्य मृत्युलाच आग्रहाने बोलावणारा वीर कुणी पाहिला आहे ? मृत्यूचेच भाग्य उजळणारे जे काही थोडे वीर होऊन गले, त्यांपैकी एक म्हणजे तात्या !

'केवळ दुःखच सोसायला मला आता मुळीच जगायचं नाही,' असे उद्गार ते जिवाच्या इतक्या आर्ततेने, व्याकुळतेने व लहान मुलासारखा केविलवाणा हुंदका देऊनही काढीत असत, की ऐकणाऱ्याचे हृदय हेलावून जाई. '**केवळ दुःख सोसायला**' ह्या शब्दांनी तर मनात झरझर त्यांचा जीवनपट उलगडला जाई नि वाटे धैर्याच्या, सहनशीलतेच्या पोलादी पडद्याखाली झाकलेली वा दडलेली ही त्यांची खोल वेदना ! खरेच किती किती सार्थ आहे ! परंतु ह्या धर्यमहामेरूतल्या वेदनेचे हे जिवंत प्रवाह फारच क्वचित बघावयास मिळत. अशा वेळी ते स्वतःला पटकन सावरून घेत नि समजूत पटविण्याच्या आविर्भावात बोलू लागत, 'हे शरीर थकलं आता. आता भूक लागत नाही, अन्न नकोसं वाटतं, उमासे यतात, पचत नाही, आतडी दुबळी झालीत.' वगैरे वगैरे बोलून विषय बदलून टाकीत.

मला सदैव छळणारी नि ठायी ठायी अडवणारी माझी पोटदुखी ! खरे म्हणजे अतीच वाईट. पण ती तात्यांच्या भेटीसाठी मात्र एखाद्या खास प्रवेशपत्रिकेसारखी उपयुक्त ठरली होती. त्या निमित्ताने का होईना १०–१५ मिनिटे तरी ते बोलत असत माझ्याशी. माझ्या दुखण्याची, अगदी काय खातेस, किती खातेस, केव्हा खातेस, पोट कसे दुखते, डॉक्टर कोण, औषधे काय ? वगैरे वगैरे इत्थंभूत चौकशी करीत. कुठेतरी त्यांच्या नि माझ्या दुखण्याचा प्रकार जुळत असे. 'मी प्रोटिनेक्स घेते. तात्या, तुम्हीही घ्या. छान वाटेल.' तर 'हो हो' म्हणत. पण बाटली नेऊन दिली तरीसुद्धा फार थोडी घेत. पण खरे म्हणजे घेतच नसत, हे मला आता पक्के माहीत झाले होते.

गप्पा मारता मारता एकदा मी अगदी ठरवूनच धाडस केले नि विचारलेच, 'तात्या ! कंटाळा आलाय म्हणता–पण तो 'सुंदर मी होणार' या स्वरूपाचा आहे का ?'

'छे छे ! मुळीच नाही ! मुळीच नाही !' तात्या अगदी कळवळून म्हणाले. तरीही मी दुसरा प्रश्न लगोलग विचारलाच, 'तात्या, तुमचा पुनर्जन्मावर विश्वास आहे ?' स्वतःला सावरीत तात्या नेहमीच्या मूडमध्ये बोलू लागले,

'अग ऽ ! पुनर्जन्म ही एक कल्पना आहे. कल्पना म्हणून ती फार चांगलीही आहे. पण ती कल्पना आहे. सत्य नव्हे ! कारण याला पुरावा नाही.' चेहऱ्यावरच्या त्या दोन तेजस्वी चांदण्या लुकलुकल्या. 'आणि त्यातूनही काय ? जर असेलच पुनर्जन्म तर परत हेच ! असंच जीवन अशीच संकटं, अशीच दुःखं ! तीच

आली परत वाटयाला, तर असंच धैर्यानं तोंड देत जगायचं.' पाहिलंत ? मृत्यु-शय्येवरचे हे उद्गार, नि ही जिद्द ! त्या शय्येला मृत्युशय्या म्हणायचे तरी कसे नि का ? समर्पक शब्द द्यायचाच झाला तर योजायचा तरी कुठला ? तपासन ! सिद्धासन ? छे छे ! नाही सुचत.

मृत्यूचे हे दूर दूर पळणे, तात्यांना दिवसेंदिवस फार तापदायक होऊ लागले होते. त्याचा न येण्याचा हट्ट नि तात्यांचा अन्न वर्ज्य करण्याचा हट्ट ! यांत जणू शर्यतच सुरू होती. परंतु तात्यांच्या ह्या शर्यतीचादेखील एक शांऽत, धिमा, चिकाटीचा, असामान्य धैर्याचा असा मन थक्क करून सोडणारा वरवर न कळणारा असा वेगही होता. दूर अंतरावर सरळ पण शांत गतीने जाणाऱ्या बाणासारखा !

आता मात्र मी रोजनिशीच्या दिनांकांसह आठवणी सांगू शकते. कारण मी त्या, त्या त्या वेळी लगेचच्या, लगेच लिहिल्या आहेत.

ऑगस्ट महिन्याचा पहिला पंधरवडा. दिवस पावसाळी. तात्यांची प्रकृती अधिक बिघडल्याचे कळल्याने मी लगेच गेले. नव्या वीज तारा बसविण्याचे काम चालू होतें. ठोक ठोक होत होती. पण प्रत्यक्ष सहनशीलतेचाच अवतार झालेल्या तात्यांची मात्र याविरुद्ध तक्रार नव्हती.

तात्या कमालीचे थकले होते. पाठीशी तक्क्या घेऊन अर्धवट बसल्यासारखे होऊन ते बोलत होते. आवाज क्षीण झाला होता. अलीकडे मी बरीच धीटपणे बोलू शकत असे.

'तात्या ! दुःख सोसायला जगू नाही, हे आम्हांलाही पटतं ! पण जाण्यासाठी तुम्ही हा जो अट्टाहास चालवलाय ना, तो पाहून जीव तुटतो. खरंच, फार वाईट वाटतं.' कशीबशी मी बोलले नि दाटून आलेल्या भावनांनी शब्दांना गाठलेच नि ते वाईट वाटणे डोळ्यांबाहेर ओघळू लागले.

तात्याही गहिवरले. 'असं रडू नाही ! आता तुम्ही चांगल्या कर्त्यासवरत्या झालात, मोठ्या झालात. तुम्ही अशा रडलात की मलादेखील फार वाईट वाटतं.' गहिवर आवरला गेला नि पुन्हा एकदा शब्दांत आर्जव नि निश्चय आला. 'हे बघ ! आपला भाऊ असो, बाप असो, मित्र असो, त्याच्या जीवनातलं जगण्यासारखं सारं संपलं, तो थकला, तो कंटाळला तर त्याला तुम्ही हसतमुखानं मरायला परवानगी दिली पाहिजे. एवढं शहाणं तुम्ही आता झालं पाहिज !" तात्या अडखळत अडखळत पण सांगतच होते. 'तुम्ही येता, भेटीची इच्छा दाखवता, अजूनही लोभ करता, बरं वाटतं ! रोज कित्तीतरी पत्र येत असतात, दूरध्वनी येत असतात. पण वाटतं आता हे प्रेम लोकांनी आवरतं घ्यावं, नि खराखुरा प्रेमाचा निरोप लवकरात लवकर द्यावा. पण लोकांना हे पटत नाही.' जरा वेळ तात्या स्तब्ध झाले नि 'मलादेखील खूपखूप बोलावंसं वाटतं. पण मागून मलाच त्या गोष्टींचा फार त्रास होतो. बोलूनदेखील मी थकतो हे तू पाहिलंसच.' नि मग नेहमीप्रमाणे घरची विचारपूस केली नि मी घरी आले.

मी परत १०–१२ दिवसांनी गेले होते. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या नि मी निघाले. मी निघताना विचारले, 'तात्या, मी रोज येत जाऊ?'

'नको नको, तू घरी वाटलं तर रोज ये. विदूशी बोल. सुंदरशी बोल. तुझं त्यांच्याशी चांगलं आहे.–पण मला मात्र भेटायला येऊ नकोस. हे बघ! वाईट मात्र वाटून घेऊ नकोस.' नि परत गोड भाषेत समजूत घालू लागले, 'माझी प्रकृती आता अशीच राहणार. विशेष काही वाटलं तर मीच बोलवीन बरं तुला! ये आता.' ह्या शेवटच्या वाक्यांची नि त्यांतल्या भावनांची आता मला सवय झाली होती.

मी निघाले तोच 'हे बघ! आता परत जर येणारच असशील तर मात्र एक सुई नि इंजेक्शन आण नि टाक मला कायमचा झोपवून! अशी येणार असलीस तरच ये! मला आता अगदी कंटाळा आलाय जगायचा! एम. ए. वगैरे झालीस त्यापेक्षा नर्सिंग का नाही शिकलीस? पण हे इतकं शिकलीस हेसुद्धा कौतुकच आहे.' पुन्हा एकदा त्यांची मनोवृत्ती सावरली गेली.

आठवणींना व्यक्तिगताचा स्पर्शही होऊ द्यायचा नाही हे ठरविले असले तरी-देखील सांगावेसे वाटतंच! आजार, अडचणी, मुलं, संसार हे सांभाळून मी जे काही शिकले त्याचे तात्यांनी केले तसे तोंडभरून कौतुक कोणीही केले नाही. एकदा माझ्या वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या कन्येला घेऊन मी तात्यांना भेटायला गेले होते. तिला ते सांगत होते, 'मीदेखील तुझी Anatomy वगैरे वाचली आहे बरं का! छान शिक्षण घेते आहेस. तुम्ही मुलं चांगली निघाली आहात. फार बरं वाटतं पाहून.' नि निघताना तर, 'हे बघ सुलभा, तुमच्या आईंनी तुमच्यासाठी फार कष्ट सोसले आहेत बरं, अगदी जिवापाड श्रम केले आहेत. तिला तुम्ही सुख दिलं पाहिजे. तिची जाण ठेवली पाहिजे.' तात्यांनी हे सांगितले त्या माझ्या कौतुकाला नि सुखाला दुसरी तोड नाही. ह्या दोन आठवणींनी सदैव आनंद व आदराने उफाळून येणारा माझा गहिवर मी लपवू तरी कसा नि का? 'धन्योऽहं' म्हणत कृतार्थ झालेल्या तात्यांनी मलादेखील या शब्दांनी नित्याची धन्य नि कृतार्थ करून टाकली! श्रमांचे चीज झाले या भावनेने आनंदलेले माझे मन म्हणते, 'जीवनात अजूनही काही बरंवाईट सोसणं आलं तरी हरकत नाही.' तात्यांच्या कौतुकाने आलेला जोर आहे हा! त्या शाबासकीचे हे बळ आहे!

भारत–पाकिस्तान युद्धपर्व सुरू झाले नि संपले. उत्साहाने आनंदून जायला लावणाऱ्या बातम्या वृत्तपत्रे देत. तात्यांची प्रकृती सुधारू लागल्याची बातमीही मधून मधून येई. अर्थात् मी गेलेच होते. 'तात्या, राधाकृष्णन्‌नी विचारले आहे म्हणे की तुम्हांला आपल्या विजयाच्या युद्धवार्ता सांगता की नाही म्हणून.' यावर तात्या एक चमत्कारिक पण खिन्नतेने हसले नि म्हणाले, "साऱ्या देशाला आनंद देणाऱ्या बातम्या मला एकट्याला वेगळ्या कशाला सांगायला हव्या?' परत थोडे थांबून म्हणाले, "ठीक आहे! ६२ चा वचपा तरी चांगला भरून निघाला!

ह्या शास्त्री थोडा वेगळा मनुष्य दिसतोय. तरीपण ह्यांच्यावर विश्वास नाही. हे केव्हा कुठे माघार घेतील याचा नेम नाही." नि हा विषय मग तिथेच संपला.

डिसेंबर संपला नि जानेवारी आला तो ताश्कंद करार घेऊनच. त्यातच शास्त्रींचेही निधन झाले.

तात्यांची प्रकृती परत ढासळू लागली. थोडा काळ आलेला जगण्याचा उत्साह ओसरून गेला नि आता शर्यतीला पुन्हा वेग आला. अन्न संपूर्ण वर्ज्य ! आता फक्त पेय नि तेही फक्त पाणीच ! पाण्यात काही औषध घालतात ही शंका येताच तेही वर्ज्य करण्याचा निर्धार धारदार भाषेत सांगितला गेला.

आता मात्र माघार घेणे नाही, ह्या एकाच भावनेने तात्यांचा देह भारून गेला होता. मृत्यूचा अट्टाहास आता कमालीच्या निर्धाराने जिद्दीस पेटला होता. नियतीला काय करू, कसे करू, केव्हा करू हे सुचेनासे झाले होते जणू ! डोंगरच आता महंमदाकडे निघाला होता.

शुक्रवारचा तो दिवस ! महाशिवरात्रही त्याच दिवशी होती. तात्यांची इच्छा लवकरच फलद्रूप होणार हे सत्य आता उघडया डोळयांनी दिसण्याइतके स्पष्ट झाले होते. मी माझ्या नित्यनेमाप्रमाणे शंकराची बिल्वदले व पांढरी फुले वाहून शांतचित्ताने बराच वेळ पूजा केली नि खरोखर सांगते, अगदी जिवाभावाने कळवळून प्रार्थनाही केली 'आई अंबे ! जगदंबे ! आज शुक्रवार म्हणजे तुझा शुभवार ! तू तात्यांची कुलस्वामिनी ! तुझं हे लाडकं लेकरू मुक्तीसाठी तळमळतंय ! माते, दया कर ! दया कर ! श्रीशंकरा ! आज महाशिवरात्र ! फार भाग्याची पर्वणी आहे ही ! आपल्याला उग्र तपश्चर्येचं फार प्रेम आहे ना ? मग अजूनदेखील, समाधान नाही का झालं देवा ? गौरीहरा ! तुम्हांला अगदी विनवून सांगते की जायचंच आहे तात्यांना, तर देवा निदान आज तरी न्या ! करा त्यांचं सोनं ! करा त्यांना मुक्त ! कैलासलोकप्राप्तीइतकं महापुण्य त्यांनी नक्कीचं केलंय ! आई अंबे, करुणा कर नि आपलं हे लाडकं लेकरू आजच्या शुभदिवशीच आपला पदरात घे !" परंतु आत्तापर्यंत आपल्या प्रिय माणसाला आयुष्य मागणाऱ्या–जीवदान मागणाऱ्या आर्त प्रार्थना ऐकणाऱ्या–शंकरपार्वतीला ही प्रार्थना बहुधा चुकीची वाटली, वेडेपणाची वाटली की काय ते कळत नाही, पण जे आज घडावेसे वाटत होते ते घडले मात्र नाही.

त्या शिवरात्रीच्या दिवशी दुपारी तात्या माधुरीशी (प्रभातची कन्या, तात्यांची नात) बोलता बोलता म्हणाले होते,

'माधू, आज शिवरात्र आहे ना ! मग आज काय काय केलं होतं ? काय काय खाल्लं आज ?' त्यावर माधुरीने उपासाच्या पदार्थांची नावे त्यांना सांगताच तात्या म्हणाले,

'अरे वा ! छान आहे की तुमचा उपास ! मजा आहे !'

'तात्या ! तुम्हांला खावंसं वाटतंय ? आणू मी थोडं थोडं !' बिच्चारी पोर ! अगदी आनंदाने, उत्साहाने तिने विचारले होते.

'नको ग बाई ! सगळं कसं अगदी छान जमवीत आणलं आहे. आता अगदी थोडक्यावर आलं आहे ! उगीच कशाला...' नि वाक्य तिथेच संपले होते. तात्याही मनुष्यच होते. त्यांना रुची छान होती, इच्छाही होती. आवडही होती, पण तरीही संयम निर्धार हा असा अपूर्व होता.

त्याच दिवशी ते प्रभालाही म्हणाले होते, 'प्रभे, आज शिवरात्र ना ! पण तुमचा तो शंकर मी इतके दिवस इतके कडक उपास करतो आहे, पण मला काही अजून पावत नाही.' – यावर प्रभा तरी बिचारी काय बोलणार ?

शुक्रवार गेला. शनिवार उजाडला ! दुपारच्या वेळी माझे मेहुणे डॉ. काळे (तात्यांचे भाचे–त्यांच्या बहिणीचे पुत्र) नाशिकहून तात्यांना भेटायला म्हणून आले. चहापाणी झाल्यावर ते सावरकर सदनात गेले. दिवेलागणी झाली. ७ झाले, ७॥ झाले. अजून हे परत का येत नाहीत ? जीव बेचैन झाला नि मी तडक निघा-लेच. संध्याकाळच्या सुमारास [अमावास्याही सुरू झाली होती] तात्यांची प्रकृती बरीच बिघडली होती. सर्वजण हादरून गेले होते. थोडासा काहीतरी गैरसमज झाल्याने इतके दिवस स्थितप्रज्ञासारखे शांत असलेले तात्या कमालीचे रागावले होते. अगदी कक्षेत आलेल्या मृत्यूला हे भोवतालचे लोक अडथळा करीत आहेत असे त्यांना वाटत होते. एका वितीच्या अंतरावरदेखील ऐकू न येणारा तात्यांचा आवाज आता कमालीचा मोठा नि स्पष्ट झाला होता. अगदी शेजारच्या खोलीत-देखील स्वच्छ ऐकू येण्याइतका ! सर्व वृत्त ऐकून थक्क झालेली, भयभीत झालेली मी ! खोलीत हळूच डोकावले ! 'डॉक्टर, तुम्ही कुणीही आता माझ्या मार्गात येऊ नका ! कृपा करा फक्त काही क्षणांचा प्रश्न आहे आता." तात्या सांगत होते. मघाचा तो जोर, तो आवेश कुठून आला होता त्यांना ? विझण्यापूर्वी प्रज्व-लित होणाऱ्या ज्योतीचे ते तेज होते, की अखेरच्या निग्रहाचे बळ होते ? की कालसागरात गुडूप होण्यापूर्वीच्या उडीतला तो जोष होता ? असे काहीसे मनात येऊन गेले.

मग थोडा वेळ थांबून मी घरी आले. माझे मेहुणेही त्या दिवसापासून मुंबईला माझ्याकडेच राहिले. जेवणाखाण्याव्यतिरिक्त ते सदैव सावरकर सदनातच असत नि योगायोग असा की तात्यांचा मृत्युदेखील त्यांनाच सांगावा लागला. कारण त्या घटकेला तेच तात्यांजवळ होते.

दुसऱ्या दिवशी रविवार ! अमावास्या ! आज मनात दुसरी प्रार्थना सुरू होती सारखी ! 'देवा, तू आज मात्र तात्यांना नेऊ नकोस, खरंच नको ! कारण हे नत-द्रष्ट लोक– 'बघा अवसेला गेला ना, बघा कसा पापी आहे तो' – असं अभद्र-देखील बडबडतील.' अत्यवस्थ प्रकृतीची वार्ता वाऱ्याच्या वेगाने पसरली होतीच.

लोक बिचारे मुकाटयाने पण बावरलेल्या चेहऱ्याने सावरकर सदनाभोवती घिरटया घालीत नि आता जरा बरे आहे असे कळल्यावर खुललेल्या चेहऱ्याने निघून जात.


कालच्या शनिवारपासूनच तात्यांच्या प्रयाणाला कमालीचा वेग आला होता. शरीराला मिळणारे पाणी तेही अगदी घोटभरावर आले होते. पंचमहाभूतांचे हे शरीर त्यांत विलीन होण्यासाठी अधीर झाले होते. ही क्रिया इतकी शांत नि अंतस्थ चालली होती की बाहेर तिचा एकही उद्‌गार नव्हता. ही हालचाल, हा प्रवास स्पष्टपणे कळत होता फक्त डॉक्टरांना !

या दिवसांत एकदा डॉक्टर म्हणाले होते, 'तात्या, तुम्हांला जायचं आहे तर जा, पण सुखानं जा. तुमचे हाल आम्हांला पटत नाहीत, सहन होत नाहीत, बघवत नाहीत.' त्यावर तात्यांनी जे उत्तर दिले त्याला तोडच नाही. तात्या म्हणाले, 'डॉक्टर, माझे हाल होताहेत, असं मी कधी म्हटलंय का ? कधी दर्शवलंय काय ? कधी कण्हलो तरी आहे का ?' प्रश्न अगदी अगदी खरा होता. खरंच सांगते, तात्यांनी अगदी अखेरच्या क्षणापर्यंत यातले काहीही अगदी कधी चुकूनसुद्धा केलेले नाही. याला साक्षी आहेत तात्यांभोवतालची डॉक्टरांसकट सर्व मंडळी ! मी दिव्य म्हणते ना ते हेच. जीव हळहळतो–नि थक्कही होतो तो यानेच नि जराशा दुखण्याने कण्हताना, विव्हळताना केव्हाही लाज वाटते ना तीदेखील याच आठवणीने !

अखेर शनिवार दि. २६ फेब्रुवारी [ फाल्गुन वद्य षष्ठी ] उजाडला. तात्यांचे अंग पुसण्यासाठी म्हणून गरम पाणी आणवले होते. इतक्यात भगवत् गीतेत वर्णिलेला भाग्यक्षण उभा राहिला नि त्याच्याच आधाराने ज्याची इतके दिवस आर्ततेने मार्गप्रतीक्षा चालली होती–ज्याच्या प्राप्तीसाठी खडतर साधना चालली होती–तो मृत्यूही आला. शिवरात्रीच्या प्रार्थनेला साद नि दाद आत्ता मिळाली. मृत्यूच्या भेटीस उत्सुक असलेल्या या दिव्य पुरुषयोग्याने त्याला शांत चित्ताने नि उघडया डोळयांनीच भेट दिली. सकाळी ११ वाजून १० मिनिटे झाली नि हे दिव्य जीवनपर्व संपले ! त्याची कालपटावर नोंदही झाली.

ते जीवन संपले. पण आठवणी ? त्या संपल्या नाहीत. संपणारही नाहीत. त्या लोकांच्या रांगा ! ते दुःखी ! ते अनावर हुंदके ! ते गीता श्लोक ! त्या तात्यांच्याच कविता ! ती भजने. ते हार. त्या सभा नि भाषणे ! ते लेख. ते कौतुक. तो गौरव ! सारे काही भराभर मनात जमा होते नि वाटते–

अनेक फुले फुलती । फुलोनि सुकूनिया जाती
परि आठवणींची ही सुमने । मनी सदा सुगंधा देती.



# पुस्तके

## व्होल्गा जेव्हा लाल होते

व्यक्ती की परिस्थिती हा इतिहासातला जुना वाद असला, तरी इतिहासाने बहुश: व्यक्तीच्या बाजूने निर्णय दिला आहे. शिवाजी महाराजांच्या बालपणाचा काळ हा वस्तुत: शहाजी राजांच्या ऐन उमेदीचा काळ होता. पण म्हणून शहाजी राजे काही स्वराज्य-संस्थापना करू शकले नाहीत. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीत रशियापेक्षाही क्रांतीला आवश्यक असे वातावरण होते. मार्क्सच्या सिद्धांताप्रमाणे शेतीप्रधान रशियाऐवजी उद्योगप्रधान जर्मनीत कम्युनिस्ट क्रांती व्हायला हवी होती. पण बोल्शेविक क्रांती झाली ती रशियात. आणि

## लेनिन : जसा होता तसा

याचे श्रेय लेनिनलाच द्यायला पाहिजे. लेनिन नसता तर रशियात कम्युनिस्ट क्रांती झाली नसती. आणि झाली असती तरी ती टिकली नसती. फ्रेंच राज्यक्रांती-प्रमाणेच ती अल्पजीवी ठरली असती. म्हणून रशियन राज्यक्रांतीचा इतिहास हे मुख्यत्वे लेनिनचेच चरित्र ठरते. ‘व्होल्गा जेव्हा लाल होते’ हे लेनिन चरित्राला श्री. वि. स. वाळिंबे यांनी दिलेले नाव यासाठीच अन्वर्थक म्हटले पाहिजे.

दि. वि. गोखले

लेनिनच्या ५४ वर्षांच्या आयुष्याचे ढोबळ मानाने तीन कालखंड कल्पिता येतात. त्याच्या वयाच्या १७ वर्षी,

त्याचा थोरला भाऊ अलेक्झांडर यास झारच्या खुनाच्या कट केल्याच्या आरोपावरून फाशी देण्यात आले. या वेळपर्यंत लेनिन हा अगदीच सोवळा विद्यार्थी होता. वाङमयात रस घेणारा; राजकारणापासून सर्वस्वी अलिप्त राहिलेला. भावाच्या फाशीने मात्र त्याच्या सबंध आयुष्यालाच निराळे वळण लागले. येथे त्याच्या आयुष्यातील दुसरे पर्व सुरू होते. हे पर्व नोव्हेंबर १९१७ मध्ये बोल्शेविक क्रांती होईपर्यंतचे. या दरम्यान रूसो–जपानी युद्धात रशियाचा पराभव झाल्यानंतर, १९०५ साली रशियात उठाव झाला. पण त्यात लेनिनचा वाटा फारच अल्प होता व झारने विविध उपायांनी हा उठाव मोडून काढून, आपली सत्ता फिरून स्थिर केली. या कालात लेनिनचे मुख्य कार्य म्हणजे परदेशांत राहून विविध राष्ट्रांतील साम्यवादी नेत्यांशी संबंध ठेवणे व रशियात बोल्शेविक संघटना बांधणे हे होते. आपल्या वृत्तपत्रांतून तो सतत क्रांती या एकाच विषयावर लिहीत होता. क्रांतीची आवश्यकता काय, तसेच क्रांतीपूर्वी निर्माण होणारे व नंतर उभे ठाकणारे प्रश्न कोणते असतील, व त्यांवर आपली उत्तरे कोणती, यांचे अखंड विवेचन त्याने चालविले होते. रशियातील परिस्थितीवर त्याचे बारीक लक्ष होते व साऱ्या जगात क्रांती घडवून आणणे हे ध्येय त्याने निश्चित केलेले असले, तरी क्रांतीचा प्रारंभ रशियातच करण्यासाठी तो धडपडत होता. ही संधी, पहिल्या महा-युद्धात रशियाने जर्मन सैन्याकडून लागोपाठ तीन वर्षे मार खाल्ल्यानंतर आली. ७ नोव्हेंबर ( रशियाच्या जुन्या पंचांगाप्रमाणे तो ऑक्टोबर महिना होता. ) रोजी केरेन्स्कीचे हंगामी सरकार उलथून टाकून बोल्शेविक पक्षाने पेट्रो-ग्राडवर आपला रक्तध्वज फडकवला आणि जगातील पहिले कम्युनिस्ट राज्य निर्माण केले. येथून पुढली ७ वर्षे लेनिनच्या आयुष्याचा अखेरचा कालखंड ठरतो. क्रांत्युत्तर रशियाचे नेतृत्व साहजिकच त्याच्याकडे आले व अनेक प्रकारच्या अंत-र्गत व बाह्य विरोधांना टक्कर देऊन त्याने ही क्रांती स्थिरपर केली. त्याचा मृत्यू अकाली झाला, तरीही त्या वेळी सोव्हिएट रशियाला बाह्य व अंतर्गत शत्रू जवळ-जवळ उरले नव्हते. आपल्या आयुष्यातच लेनिनने त्यांचा बंदोबस्त केला होता.

या सर्व कालखंडातील लेनिनच्या व्यक्तिगत जीवनक्रमाचा, त्याच्या कार्याचा व त्याचबरोबर रशियातील परिस्थितीचा विस्तृत तपशील लेखकाने दिला आहे. या अव्वल क्रांतिवीराला काही काळ पागल करणाऱ्या स्त्रिया, त्याच्या आवडीनिवडी, त्याचे निराशेचे क्षण या बाबीही लेखकाने गाळलेल्या नाहीत, मात्र याच वेळी, लेलिनची जी प्रतिमा केवळ गैरसमजाने, किंबहुना अल्प माहितीमुळे जनमानसात निर्माण झालेली आहे, ती पुसून टाकून लेनिन खरोखर जसा होता, तसेच त्याचे दर्शन घडविण्याचे महत्त्वाचे कार्य लेखकाने केले आहे.

## लेनिन आणि स्टॅलिन

लेनिनबद्दलचा गैरसमज म्हणजे तो महान क्रांतिकारक असला, तरी एखाद्या विष्णुदासाप्रमाणे इतर वेळी ‘मेणाहुनी मऊ’ होता, अत्यंत दयाळू होता, मानवी

मूल्ये जपणारा होता हा ! लेनिननंतर स्टॅलिन अधिकारावर आला आणि स्वत:चे आसन स्थिर करण्यासाठी, तैमूरलंग, चेंगीझखान यांसारख्या क्रूरकर्म्यांना लज्जेने मान खाली घालावी लागेल, अशा तऱ्हेचा नरमेध त्याने सुरू केल्यामुळे, त्या पार्श्वभूमीवर लेनिन हा कोणी साधुसंत होता, अशी समजूत दृढ झाली. स्टॅलिनच्या मृत्युनंतर त्याचा वारस ठरलेल्या कुश्चेव्हनेच स्टॅलिनच्या दुष्कृत्यांचा पाढा वाचला व स्टॅलिन लेनिनवादापासून ढळल्याचा हा परिणाम होय, अशी मल्लीनाथी केल्यामुळे हा गैरसमज आणखी दृढ होण्यास मदत झाली, पण वस्तुस्थिती तशी नाही. लेनिन कमालीचा असहिष्णू होता. त्याच्या हातात सत्ता आली नव्हती वा कधी काळी येईल अशी अपेक्षाही नव्हती, तेव्हासुद्धा अणुमात्रही मतभेद त्याला सहन होत नसे. जो शंभर टक्के आपल्याबरोबर नाही तो आपला शंभर टक्के शत्रू हा त्याचा खाक्या असे. क्रांतीपूर्वीच्या कालात, मतभेद असणाऱ्या सर्व सहकाऱ्यांवर तो कडवट हल्ले करी. हे करताना त्याने सत्यासत्याचा विधिनिषेध चुकूनही पाळला नाही. याच मार्गाने त्याने, रशियातील हंगामी सरकारचा नेता केरेन्स्की याच्या सरकारविरुद्ध लोकमत भडकावले. बोल्शेविक क्रांतीनंतर बोलविण्यात आलेल्या रशियन घटनासभेचे त्याने ज्या दांडगाईने विसर्जन केले त्याची तुलना नाझींनी जर्मन राइश्टागला लावलेल्या आगीशीच होऊ शकेल. स्टॅलिनने दडपशाहीचे जे मार्ग वापरले, त्या सर्वांची सुरुवात लेनिनच्याच कारकीर्दीत झाली होती. आपल्याविरुद्ध एक शब्दसुद्धा निघू नये, म्हणून कम्युनिस्ट पक्षाची वृत्तपत्रे सोडून इतर सर्व वृत्तपत्रांना टाळी ठोकली ती लेनिननेच. रात्री बेरात्री लोकांना अटक करणे, कुटुंबेच्या कुटुंबे बेपत्ता करणे, विरोधकांना खटल्याशिवाय शिक्षा ठोठावणे, या सर्व गोष्टी लेनिनच्याच कारकीर्दीत सुरू झाल्या. स्टॅलिनने केवळ ट्रॉटस्कीलाच छळून मारले असे नाही, तर त्याच्या दूर-दूरच्या नातेवाईकांचीसुद्धा त्याने वासलात लावली. लेनिनच्या कारकीर्दीत झारच्या बाबतीत निराळे घडले नव्हते. झारच्या रोमानोव्ह घराण्यातील व्यक्ती औषधाला-सुद्धा जिवंत राहू नये, याची दक्षता लेनिनने घेतली होती. स्टॅलिनच्या नरमेधाला उद्देशून लेनिनची पत्नी क्रुप्सकाया म्हणाली की, लेनिन काही अधिक काल जिवंत असता, तर स्टॅलिनने त्यालाही यमसदनाला पाठविले असते ! बिचारी क्रुप्सकाया! लेनिनचेच धडे स्टॅलिन गिरवीत होता, याची तिला कल्पना नसावी. शिष्याने गुरूवर अपेक्षेबाहेर मात केली, एवढेच फार तर म्हणता येईल. लेखकाच्या शब्दांत सांगायचे तर स्टॅलिनने केलेला नरमेध हा लेनिन–पंथाचा भीषण आविष्कार होता.

## क्रांत्युत्तर कार्य

अर्थात नाण्याची ही एक बाजू झाली. लेनिन असहिष्णू असला, क्रूर असला तरी त्याचे अलौकिकत्व नाकारता येणार नाही. बोल्शेविक क्रांतीच्या या नेत्याची चालू शतकातल्या महापुरुषांत गणना करावीच लागेल. असामान्य बुद्धिमत्ता,

कठिण प्रसंगी स्वतःच्या जबाबदारीवर निर्णय घेण्याची हिंमत व घतलेले निर्णय अंमलात आणण्याची ताकद हे अती दुर्मिळ गुण लेनिनमध्ये एकवटले होते. कोणत्याही प्रश्नाची चर्चा सुरू झाली की, लेनिन इतरांपेक्षा हातभर उंच दिसे. परिस्थितीतला बदल अचूक हेरण्यात त्याचा हात कोणी धरू शकला नाही. केरेन्स्कीचे सरकार उलथून टाकण्याएवढी आपली ताकद वाढलेली नाही, असे बव्हंशी बोल्शेविक नेत्यांचे मत होते. निःशंक होता एकटा लेनिन. त्याने आपल्या सहकाऱ्यांवर आपले मत लादले व बोल्शेविक क्रांती घडवून आणली. त्याच्या इच्छाशक्तीचा हा सर्वोच्च विजय मानला पाहिजे. जर्मनीशी केलेला ब्रेस्टलिटाव्हस्कचा तह रशियात अप्रिय ठरणारा होता. पण क्रांती स्थिर करणे हेच ध्येय असलेल्या लेनिनने या अप्रियतेची पर्वा केली नाही. क्रांत्युत्तर कालातले लेनिनचे फार मोठे कार्य म्हणजे त्यान रशियाला औद्योगीकरणाच्या मार्गावर ठामपणे नेऊन ठेवले. 'सोव्हिएटस + वीज म्हणजे कम्युनिझम' अशी लेनिनची व्याख्या होती. लेनिनचा हा मंत्र, युरोपातल्या सर्वांत मागासलेल्या राष्ट्राची जणू संजीवनी ठरला व क्रांतीनंतर अवघ्या चार दशकांत, विज्ञानाच्या क्षेत्रात, दीडशे वर्षे आपल्यापुढे असणाऱ्या अमेरिकेच्या बरोबरीला रशिया येऊन बसला. श्री. वाळिंबे यांच्या ग्रंथातील लेनिनच्या क्रांत्युत्तर कार्याचे वर्णन काहीसे फिके आहे. लेनिनने रशियाच्या औद्योगीकरणाचा पाया घातला, ही वस्तुस्थिती वाचकाच्या मनावर आवश्यक तेवढी ठसत नाही. पण एकंदरीत लेखकाने लेनिनच्या कर्तृत्वाची ही बाजूही इतक्या परिणामकारक रीतीने रंगविली आहे की, विसाव्या शतकाने जे महापुरुष पाहिले, त्यांत लेनिनचे स्थान अगदी वेगळे आहे, या त्याच्या विधानाशी वाचक आपोआप सहमत होतो.

कादंबरी म्हणजे इतिहास नव्हे, असे नुकतेच श्री. दत्तो वामनांनी सांगितले. खरे आहे. पण याचा अर्थ असा नव्हे की, इतिहास अगदी गणितासारखा रूक्ष पद्धतीने सांगितला जावा. लेनिनचे जीवन व कार्य एखाद्या कादंबरीपेक्षाही अद्भुत होते. ही अद्भुतता वाचकाच्या मनाशी नेऊन भिडवावयाची असेल, तर चरित्राच्या भाषेलाही या अद्भुततेचा थोडाबहुत स्पर्श व्हावा लागतो. तसा तो वाळिंब्यांच्या भाषेला व रचनेलाही निश्चितपणे झालेला आहे. पाचशे पानांच्या या ग्रंथाच्या प्रत्येक प्रकरणाचा प्रारंभ नि शेवट, लेनिनचे चरित्र माहीत असणाऱ्या वाचकाच्याही मनात 'पुढे काय' अशी उत्कंठा निर्माण करतो. उपमा, अलंकारांनी वाळिंब्यांनी आपली भाषा कुठेही कृत्रिमपणे नटविलेली नाही. पण त्या भाषेत ओज व ओघ भरपूर आहे. त्यांची छोटी व ठाशीव वाक्ये त्यांच्या गद्यात एक प्रकारची लय निर्माण करतात. श्री. नानासाहेब गोरे यांनी ग्रंथाला छोटी पण अत्यंत मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे.

[ पृष्ठ ५२ वर ]

# जर्मन पाहुण्याबाई आमच्याकडे !

व्यं. न. कुलकर्णी

माझ्याकडे एक जर्मन पाहुण्या आल्या आहेत. सहज टूरिस्ट म्हणून !

दोन वर्षांपूर्वी एकदा त्याच आल्या होत्या. अशाच टूरिस्ट म्हणूनच !

"आहेत तरी कोण त्या ?" तुम्ही विचाराल, "बड्या श्रीमंत असल्या पाहिजेत, नाही का ?"

आता दोनदा भारताला विमानाचा प्रवास करून सहजगत्या मजेखातर येणारी बाई श्रीमान् असली पाहिजेच, हे तुमचेआमचे गणित आपल्या दृष्टीने बरोबर आहे. पण या बाईसाहेब म्हणतात, "अहो, कसलं काय घेऊन बसला आहात ? मी एक सामान्य जर्मन स्त्री. साधी ग्रंथपालिका तर आहे !"

अर्थात एखादी प. जर्मन ग्रंथपालिका भारतास जाण्याकरता दोन वर्षांत पाच-सहा हजार रुपये तरी सहज साठवू शकते हाही हिशेब ओघाने आलाच.

"हं. ते शक्य आहे म्हणा ! पण म्हणून काही आमच्यासारख्यांची गणना धनिकांत करता यायची नाही." त्या म्हणतात.

बाईंची मोटरगाडी नाही, कारण त्यांना मोटर ठेवणे व स्वत: चालविणे आवडत नाही. पण त्यांच्या अनेक सहकारी मैत्रिणी मोटर बाळगून आहेत. त्यांचा भाऊ आहे असाच एक सरकारी नोकर. त्याची मोटर आहे. "अलीकडे तर कॉलेजचे कितीतरी विद्यार्थीही स्वत:च्या गाडीनं युनिव्हर्सिटीला जातात. त्यात काही विशेष वाटत नाही, आम्हांला !"

मी बाईंना सहकुटुंब हिंडून मुंबई पुन्हा एकदा दाखवितो. अर्थात टॅक्सीने, पण बाई सतत म्हणतात, "आपण बसनं जाऊ !" बसच्या क्यूमध्ये ताटकळत राहणे, नंतर झोंबाझोंबी करणे, वेळप्रसंगी बस प्रवेशानंतरही वादंग चालू ठेवणे हे सारे मलाही जमत नाही. तेव्हा तो प्रसंग बाईंवर नको असे मला वाटते. मग गर्दीची वेळ टाळून एखाद्या दिवशी त्यांना मी बसप्रवासही घडवितो. लोकलची मज्जाही त्यांना कधीतरी चाखू द्यावी लागतेच. लोकलच्या बाहेर लोंबणारे, दोन डब्यांच्या मधल्या सांध्यांवर उभे राहणारे, गाडीच्या छपरावरही बैठक मारणारे मानवप्राणी त्यांना दिसतातच. आमच्या फर्स्ट क्लासमध्येही आम्ही अंग चोरून उभे राहतो नि देह चुरगळला तरीही शाबूत ठेवून बाहेर येतो ही केवढी कौतुकाची गोष्ट असू शकते हे त्यांच्या लक्षात येते.

"तुमच्याकडं कसं काय आहे ?" माझी पत्नी उत्सुकतेने विचारते.

"आमच्या रेल्वेपुढंही फार मोठे यक्षप्रश्न उभे आहेत, पद्माबाई!" बाई गंभीर मुद्रेने सांगू लागतात. "आमची रेल्वे काही फारशी फायद्यात चालत नाही. कारण बहुतेक लोक स्वतःच्या मोटारी ठेवतात ना! आता उदाहरणार्थ, शनिवारी नि रविवारी, आमच्या हांबुर्गमधल्या लोकल गाड्यांमध्ये दहाबारा वर्षांच्या आतल्या मुलांना कुठंही नि कितीही मोफत प्रवासाची परवानगी आहे ... तर आता आगगाडीत गर्दी कशी करावी असा प्रश्न आमच्यापुढं आहे!"

बाईंना एके दिवशी मी माझ्या जर्मन वर्गात बोलावले होते. त्यांचे एक लहानसे भाषण झाले. नंतर चर्चा. माझे विद्यार्थी म्हणजे इंजिनीअर्स, मॅनेजर, कारखानदार अशा प्रकारची मंडळी. त्यांना अर्थशास्त्रात विशेष रस. त्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना बाई म्हणाल्या,

"छ छे, प. जर्मनीची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली आहे असं समजू नका! दोन वर्षांपूर्वी प. जर्मनीत दहा लाख परदेशी कामगार होते. पण गतवर्षी मंदी आली तेव्हा आम्ही फक्त सात लाखच परदेशी कामगारांना नोकरीवर ठेवू शकलो. आता पुन्हा परिस्थिती सुधारत आहे म्हणा! पुन्हा हा आकडा दहा लाखांपर्यंत येईलसं वाटतं. तर सांगायचं कारण असं की आमच्यापुढंही फार गंभीर समस्या उभ्या आहेत ..."

"तुमच्या देशाचा निर्यात व्यापार फार प्रचंड प्रमाणात चालतो. त्यामुळं प. जर्मनी आज कुबेर झाला आहे, नाही का?" एक प्रश्न.

"अहो, तीच तर आमची मोठी डोकंदुखी आहे. आमच्या मालाला, तो महाग वाटला तरीही, नेहमी फार मोठी मागणी असते. त्यामुळं हे असं होतं. अन् मग आमची मित्रराष्ट्रं आमच्यावर रुसतात. आमची निर्यात कमी करावी या खटपटीत आम्ही असतो. इतरांचा माल खूप मोठ्या प्रमाणांत खपावा असं आम्हांला मनापासून वाटतं, पण तरीही प. जर्मन मालाचाच उठाव तडाख्यानं होतो याला काय करावं, हेच आम्हांला कळेनासं झालं आहे..."

एक दिवस आमच्या दाराशी ललकारी उठली, "बाई, रद्दी द्यायचीय् का?"

जर्मन पाहुण्याबाईंनी प्रश्नार्थक चेहरा केला तेव्हा माझ्या बायकोने त्यांना रद्दी विकणे, त्याचा दर ठरविणे, बिनलबाड काट्याची खात्री करून घेणे इत्यादी सोपस्कार समजावून सांगितले.

"तुम्ही तिकडं रद्दी विकता?" पद्माने विचारले.

बाईंना आपले हसू आवरणे मुष्कील झाले.

"नाही नाही. तिकडे कोणी रद्दी विकत नाही. आम्ही ती केराच्या डब्यांत टाकून देतो. आर्ट पेपरवर छापलेली मूल्यवान साप्ताहिकं, मासिकं आम्ही वाचून होताच टाकून देतो. नवीन फॅशनचं फर्निचर घेतलं म्हणजे जुनं फर्निचर आम्ही दाराबाहेर आणून ठेवतो. पण ते चांगलं असलं तरी कुणी वाटसरू स्वतःकरता

घेऊन जात नाही. बहुधा त्यानंही नवीन फर्निचर घेऊन हाच प्रकार केला असावा. शेवटी आमच्या नगरपालिकेची कचऱ्याची गाडी ते घेऊन जाते!"

"कचऱ्याच्या गाडीवरचे कामगारच का नेत नाहीत असलं फर्निचर?"

"काहीतरीच!" बाई म्हणाल्या, "रोजच असलं फर्निचर त्यांना निकालात काढावं लागतं, किती म्हणून घेतील ते? दुसरं असं की असलं हलक्या प्रकारचं काम करणारी माणसं आमच्याकडं मुष्किलीनं मिळतात. तेव्हा त्यांचा पगार आमच्या बड्याबड्या हपिसरांच्या पगाराहूनही कितीतरी मोठा असतो! त्यांना असल्या 'टाकाऊ' मालाची गरजच काय मुळी?"

आम्ही गेटवे ऑफ इंडियावर गेलो होतो तेव्हाची गोष्ट. निळ्या पोशाखावल्या एका माणसाने पुढाकार घेऊन आम्हांला बुरुजावर नेले. आम्ही मुंबईच्या सागराची शोभा पाहून खाली उतरलो. जर्मन बाईही सावकाश उतरल्या.

फ्लोरा फाउंटनपाशी बरेचसे निळ्या पोशाखातले लोक उभे होते.

"हे कसले स्वयंसेवक आहेत काय?" बाईंनी विचारले.

"छे हो, हे पोलीस आहेत!" मी म्हणालो.

"मग गेटवे ऑफ इंडियाशी भेटलेला कोण होता तो? पोलीसच काय?" बाईंनी भांबावून विचारले.

"होय, अर्थातच!"

"त्यानं माझ्याजवळ बक्षिसी मागितली!"

"तुम्ही दिली?"

"हो, पाच रुपये दिले. तो अगदी दीनवाण्या चेहऱ्यानं मागू लागला. मला वाटलं तो एखाद्या संस्थेतला गरीब स्वयंसेवक असावा! इकडं पोलीस पैसे मागू शकतात?" त्यांच्या या प्रश्नाचे उत्तर कसे नि काय द्यावे हे मला कळेना.

"तुमच्या देशात असं घडतं का?" पद्माने विचारले.

"भलतंच!" बाई अशा आवाजात बोलल्या की आम्हांला वाटले, इतका वेडगळ प्रश्न त्यांनी जन्मात प्रथमच ऐकला असावा!

अन् मग त्या मनापासून हसत म्हणाल्या, "माफ करा हं माझं काही चुकलं असेल तर! मी इंडियात आहे हे लक्षात ठेवायला हवं होतं मी!" ○

---

**लेनिन जसा होता तसा...** ...पृष्ठ ४९ वरून

कम्युनिझमचे संकट आपल्या दाराशी येऊन ठपले आहे, अशा वेळी त्याची योग्य ओळख करून घेणे हे आपले कर्तव्य ठरते. श्री. वाळिंबे यांनी लेनिनच्या विस्तृत चरित्राद्वारे ही ओळख फार चांगल्या रीतीने करून दिली आहे. त्यांनी येथेच न थांबता, माओ-त्से-तुंगचे चरित्रही मराठी वाचकांना सादर करावे, अशी सूचना केल्यावाचून राहवत नाही. ○

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

श्री. गो. जोशी सायनाचार्य

२२ ते २८ फेब्रुवारी–राशिभविष्य

**मेष** : सूर्य एकादशात असेपर्यंत आपणांस डर नाही. शनी-मंगळांच्या अनिष्टतेची पर्वा करावयाचे कारणच नाही.

गेल्या आठवड्याप्रमाणे याही आठवड्यात आपल्या अंगीकृत कार्यात आपण आवाज उठवाल. नव्या योजना, नव्या कल्पना घेऊन पुढे पुढे जात राहाल.

पैसा आणि प्रकृती यांसंबंधी मधून मधून चिंताजनक विचार डोक्यात आले तरी फारसे काळजी करण्यासारखे काही घडणार नाही.

शैक्षणिक क्षेत्रात, कलासाहित्याच्या प्रांतात प्रतिष्ठा उंचावेल असे काही याच आठवड्यात करून दाखवाल.

दि. २४ ते २६ अनुकूल काल.

**वृषभ** : मंगळ सप्तमात असल्यापासून आपला प्रगतीचा मार्ग रोखला जातो की काय, अशी सारखी भीती वाटू लागेल. पण प्रत्यक्षात तसे काही घडेल, असे मला मुळीच वाटत नाही.

याही आठवड्यात तुमच्या योजना गती घेऊ लागतील. अनेकांचे सहकार्य लाभेल. संशोधन विभागांत, शैक्षणिक क्षेत्रात विशेष भरीव असे कार्य याच आठवड्यात करून दाखवाल.

सामाजिक व राजकीय क्षेत्रांतून मात्र काही काल काढता पाय घ्यावा. ही वेळ विरोधकांशी दोन हात करण्यास फारशी अनुकूल नाही.

मंगलकार्याच्या योजना निश्चित ठरतील, स्यवरासंबंधीचे विचार कृतीत उतरवाल. नोकरीधंद्यांतही मागे पाऊल घेण्याचा प्रसंग येणार नाही.

दि. २५ ते २८ हा काल आर्थिक काल.

**मिथुन :** सूर्य भाग्यात एवढी एकही गोष्ट आपल्या व्यावहारिक व कौटुंबिक अपेक्षा सफल करायला पुरेशी आहे.

हा आठवडा खूपच धाईगर्दीचा, धावपळीचा जाईल. अनेक प्रश्न भराभर सोडवावे लागतील. नोकरीधंद्यासाठी दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवावे लागेल. मंगलकार्ये निश्चित स्वरूप धारण करतील.

दशमात मीनेचा शुक्र आहे तोपर्यंत व्यापारी उलाढाली मोठ्या प्रमाणावर करू शकाल. सामाजिक व राजकीय क्षेत्रांतही तुमच्या उपस्थितीची नितांत गरज भासू लागेल.

विरोधक सहसा तुमच्या वाटेला जाणार नाहीत. सांपत्तिक लाभ मोठ्या प्रमाणावर जरी झाले नाहीत तरी भविष्यकाळ आशादायक आहे याची प्रकर्षाने जाणीव व्हावी.

दि. २५ ते २८ या कालात आपल्या साऱ्या योजना गती घेऊ लागतील.

**कर्क :** शुक्र–मंगळ–गुरू हे सारे समर्थ ग्रह तुमच्या पाठीशी उभे आहेत. ते तुमची प्रतिष्ठा तर वाढवतीलच, शिवाय व्यावसायिक यशही अपेक्षेबाहेर पदरी टाकून जातील.

साहित्य आणि कला क्षेत्रांशी संबंध असणाऱ्यांना तर हा एक पर्वकाल जाणवेल. कर्तृत्व आणि प्रतिभा बहरेल.

नव्या व्यवसायधंद्याच्या कल्पना आकार घेऊ लागतील. वैचारिक दिलजमाई होईल, साऱ्या अडीअडचणी संपुष्टात येतील. हवामान अनुकूल असल्यामुळे जाल तिथे आणि कराल त्यात घवघवीत यश मिळवाल.

दि. २३ ते २५ विशेष यशदायी काल.

**सिंह :** मंगळ चौथा–शनी आठवा, ही ग्रहस्थिती एकंदरीत स्वास्थ्याची दिसत नाही. आत्मविश्वासाची तटबंदीही या अनिष्ट ग्रहांचे आघात सहन करू शकेलच असे निश्चितपणे सांगता येणार नाही.

प्राप्तीत घट–खर्चात वाढ हे व्यस्त प्रमाण हरघडी जाणवेल. त्याचा परिणाम आचाराविचारांवर व व्यवहारधंद्यावर होणे अपरिहार्य आहे.

त्यातूनही मार्ग निघेल, व्यावहारिक अपयश सहसा येणार नाही. दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा. या वेळी स्थावराचा प्रश्न अपेक्षेप्रमाणे सुटू शकणार नाही. लोकांच्या अभिवचनांवर फारसे अवलंबून राहता येणार नाही.

दि २६ ते २८ अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल व्हाव्यात.

**कन्या :** गुरूचे सामर्थ्य आणि मंगळाचे कर्तृत्व यांचा प्रत्यय पावलोपावली यायला लागेल. आगामी महिन्याभरात आपले सारे प्रश्न भराभर सुटू लागतील. नोकरीत आकस्मिकपणे प्रगती घडेल. धंद्याचे क्षेत्र व्यापक बनल. अनेकांचे सद्कार्य न मागताही लाभेल. पैशाअडक्याची विवंचना सहसा जाणवणार नाही.

व्यापारधंद्यात फार मोठ्या उलाढाली होतील, परराष्ट्रीय व्यवहाराकडे विशेष लक्ष लागेल. दैविक कृपेचा प्रत्यय पदोपदी यायला लागेल.

दि. २४ ते २७ या दिवसांत अनेक कार्ये घाईगर्दीने हातावेगळी करावी लागतील.

**तूळ :** सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा वाढविणाऱ्या अनेक घटना या काली घडाव्यात, की ज्यामुळे आपला भविष्यकाल अधिक आकर्षक बनेल. उद्योगधंद्याचे तंत्र बदलेल आणि तो बदलच आपणांस अमाप यश देणारा जाणवेल.

या आठवड्यात आपले अनेक ठिकाणी सत्कार घडतील आणि त्या उत्स्फूर्त सहकारातून स्फूर्ती घेऊन अभिनव, आकर्षक असे कार्य करण्यास आपण उद्युक्त व्हाल. गुरु बारावा आहे म्हणून आपल्या कार्याची गती मंदावू देऊ नका.

सांपत्तिक लाभाने या वेळच्या कार्याचे मूल्यमापन करता येणार नाही. सांपत्तिक लाभापेक्षा लाख मोलाची प्रतिष्ठा या काली लाभेल.

दि. २६ ते २८ येथूनच आपणांस नवी दिशा लाभेल.

**वृश्चिक :** तुमच्या राशीतील मंगळाचे दीर्घकालीन वास्तव्य आपणांस त्रासदायक ठरेल, असा गैरसमज करून घेऊ नका. गुरू एकादशात असेपर्यंत मंगळच काय, कोणताही ग्रह आपल्या वाटेस जाण्याचे धाडस करणार नाही.

आपली सारी कामे वेग घेऊ लागतील. आपल्या कर्तृत्वाला धार चढेल. यांत्रिक क्षेत्रात तर आजवर सहसा कुणालाही न लाभलेले यश मिळू शकेल.

धावपळ-धडपड मात्र सतत करावी लागेल. राजकीय, सामाजिक जबाबदाऱ्या खूपच वाढू लागतील. स्थावराचा प्रश्न या वेळी सहजासहजी सुटेल. वाहनाची विवंचना मिटेल. मंगलकार्याचेही निश्चित ठरावे.

दि. २४ ते २८ अनुकूल व लाभदायक काल.

**धनू :** एकट्या व्ययस्थ मंगळामुळे सारे काही बिघडेल असे मुळीच वाटून घेऊ नका. दशमातील गुरू साऱ्या अनिष्ट ग्रहांना शह द्यायला समर्थ आहे.

सांपत्तिक ताण थोडाफार सहन करावा लागला तरी परिस्थिती हाताबाहेर मुळीच जाणार नाही. उद्योगधंद्याचे तंत्र आमूलाग्र बदलावे लागेल. इष्टमित्रांचे सहकार्य हरघडी घ्यावे लागेल, स्थावर व्यवहारात नेहमीच जुळते मिळते घेणे भाग पडेल.

मोटार-यांत्रिक धंदा या बाबतींत फारच दक्षता बाळगायला हवी. नोकराचाकरांवर संपूर्ण विश्वास टाकणेही इष्ट ठरणार नाही.

दि. २६–२७–२८ या काली प्रयत्न कारणी लागावेत.

**मकर :** भाग्यस्थ गुरूबरोबरच मंगळ एकादशात असल्यामुळे आपण आणखी एक पायरी वर चढाल. या काळी अनंत चिरंतनस्मृतीच्या घटना घडू लागतील. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. प्रगतीचे नवे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील.

नोकरीचाकरीत, व्यापारधंद्यात अपेक्षित असे सर्व काही लाभेल. मंगलकार्याची भाषा निश्चित स्वरूपाची बोलली जाईल.

दविक कृपेचा पदोपदी प्रत्यय यावा. अनपेक्षित लाभालाही हे दिवस निश्चितच प्रगतीचे आहेत. शक्षणिक क्षेत्रात, कलाविश्वात तुमची प्रगती चौफेर उधळू लागेल. सामाजिक क्षेत्रात अनन्यसाधारण कार्य करून दाखवले जाईल.

दि. २४–२६–२८ हे दिवस विशेष यश-प्रतिष्ठा देणारे आहेत.

**कुंभ :** मंगळ दशमात आणि तोही ७-८ महिने वास्तव्य करणार असल्यामुळे अन्य अनिष्ट ग्रहांचा परिणाम आपल्यावर मुळीच होणार नाही.

व्यावसायिक व सांपत्तिक जबाबदाऱ्या वाढू लागतील. थोरामोठ्यांचे सहकार्य लाभेल. राजकीय क्षेत्रात अत्युच्च स्थान लाभेल. साहित्याच्या क्षेत्रात आजवर कधी केले नसेल असे महत्त्वपूर्ण कार्य करून दाखवाल.

मंगलकार्यात भाग घेऊन ते यशस्वी करून दाखवाल. उद्योगधंद्याचे तंत्र बदलेल. अनेकांच्या सहकार्यामुळे नवा यांत्रिक धंदा सुरू करण्याचे याच वेळी निश्चित ठरेल.

दि. २३–२४–२७ विशेष प्रगतीचे दिवस.

**मीन :** कन्या-गुरू आणि भाग्यस्थानातील वृश्चिकेचा मंगळ हे तीन ग्रह सध्या आपले चारित्र्य घडवीत आहेत. दूरचा प्रवास घडेल. नवे कार्यक्षेत्र हस्तगत होईल. प्रगतीला पोषक अशा अनक घटना भराभर घडून यायला लागतील.

साहित्य आणि कलाक्षेत्रांतील व्यक्तींना तर हा अत्युत्तम काल कित्येक वर्षांनी आताच वाटचास येत आहे. आरोग्य सुधारेल, सांपत्तिक अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होतील.

आता तुम्ही साडेसाती विसरू शकता. नवे विचार, अभिनव कल्पना घेऊन आपण भविष्यकालाची वाटचाल करू लागाल.

दि. २६ ते २७ अत्युत्तम लाभाचे दिवस. ○




MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

लवकरच सुरू होत आहे

ॲडव्होकेट माधव कानिटकर यांची

एक प्रदीर्घ लेखमाला

विषयस्फोट : पुढील अंकी

माणूस

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर